जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगर-पुणे महामार्गावर गोळीबार करणारा आरोपी काही तासांत जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ठोकल्या बेड्या

नगर – गणपती घेऊन घरी जाणाऱ्या तरुणावर कार घालून आणि गावठी कट्ट्यातून गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या सराईत आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही तासांत जेरबंद केले आहे. शिरूर येथून या आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, ओम दीपक भोंडे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

गणेश चतुर्थीच्या दिवशी १४ सप्टेंबर रोजी रात्री फिर्यादी प्रशांत संदीप वाबळे (वय २१, रा. म्हसे, ता. पारनेर) हे आपल्या मित्रासह शिरूर येथून गणपतीची मूर्ती घेऊन घरी येत होते. गव्हाणवाडी ते शिरूर जाणारे घोडनदीवरील पुलाजवळ ते थांबलेले असताना, आरोपींनी त्यांच्या ताब्यातील व्हेरना कार फिर्यादी व त्यांच्या मित्राच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. तसेच आरोपी किशोर शिंदे याने गावठी कट्ट्यातून फिर्यादीवर थेट फायरिंग करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), १८९(२), १९०, १९१(२) आणि आर्म ॲक्ट ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



नगर-पुणे महामार्गावर गोळीबार करणारा आरोपी काही तासांत जेरबंद केल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

अग्निशस्त्राचा वापर करून झालेल्या या खुनाच्या प्रयत्नाच्या घटनेची गंभीर दखल घेत अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे आणि अंमलदार सुनील पवार, रोहित येमुल, सागर ससाणे, विशाल तनपुरे, अमृत आढाव, फुरकान शेख व प्रशांत राठोड यांच्या दोन पथकांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपास पथकाने गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माहिती गोळा केली. या दरम्यान १५ सप्टेंबर रोजी या गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी ओम दीपक भोंडे (वय २१, रा. अण्णापूर, ता. शिरूर, हल्ली रा. शिवतीर्थ हाईट्स, बाबुरावनगर, शिरूर, जि. पुणे) हा बाबुरावनगर येथे लपून बसल्याची माहिती मिळाल्याने पथकाने तातडीने तेथे छापा मारून आरोपी ओम भोंडे याला ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी बेलवंडी पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले असून, पुढील तपास बेलवंडी पोलीस करत आहेत.

## नगर-पुणे महामार्गावर अपघात; वृद्धाचा मृत्यू

नगर – पारनेर तालुक्यातील वाघुंडे शिवारात हॉटेल समाधानसमोर रस्ता ओलांडत असताना एका अज्ञात कारने दिलेल्या जोरदार धडकेत ६० वर्षीय वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अपघात घडल्यानंतर कार चालक जखमीला उपचारासाठी रुग्णालयात न नेता घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संकेत अहिलु साठे (वय ३०, धंदा– शेती, रा. साठे वस्ती, हंगा, ता. पारनेर) यांनी सुपा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ११ सप्टेंबर रोजी रात्री ८ ते ८:३० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे चुलते मोहन नबाजी साठे (वय ६० वर्षे, रा. हंगा, ता. पारनेर) हे त्यांची बहीण वृषाली शेळके यांना भेटून पळवे कडून अहिल्यानगर रोडने चालत येत होते.

दरम्यान, वाघुंडे शिवारातील हॉटेल समाधानसमोर रस्ता ओलांडून पलीकडे जात असताना एका अज्ञात कार चालकाने आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने चालवून मोहन साठे यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात मोहन साठे यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघात घडल्यानंतर कार चालक अपघातग्रस्तास मदत न करता किंवा दवाखान्यात न नेता तेथून कारसह पळून गेला.


मात्र, अपघात घडलेल्या ठिकाणी सदर कारची तुटलेली नंबर प्लेट (एमएच १२ वाय बी ७४३३) पोलिसांना मिळून आली आहे. या प्रकरणी १४ सप्टेंबर रोजी दुपारी सुपा पोलिसांनी कार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१, १२५(अ),(ब) सह मोटर वाहन कायदा १३४(अ)(ब), १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## अनिल गुंदेचा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सारसनगर येथील रहिवासी अनिल अमोलकचंद गुंदेचा (वय ५८) यांचे १४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ सप्टेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, १ मुलगी, ३ भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. पोपटलाल, सतीषलाल, अशोकलाल गुंदेचा यांचे ते बंधू, पलाश गुंदेचा यांचे वडील तर सचिन गुगळे (संभाजीनगर) यांचे ते मेहुणे होत.

## अंजय्या यंगल यांचे अल्प आजाराने निधन



नगर – अखिल भारतीय पद्मशाली संगमचे सेक्रेटरी व मार्कंडेय मंदिराचे ट्रस्ट, दिल्लीगेट येथील रहिवासी अंजय्या नारायण यंगल (वय ८८) यांचे १५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


## भाग्यश्री बनकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नागरदेवळे येथील रहिवासी भाग्यश्री सागर बनकर (वय ३०) यांचे १५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागरदेवळे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सासु, सासरे असा परिवार आहे. सागर कानिफनाथ बनकर यांच्या त्या पत्नी होत.


## राजेंद्र डहाळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भूषणनगर नगर बँक कॉलनी, केडगाव येथील रहिवासी राजेंद्र गोपाळराव डहाळे पिंपळेकर (वय ६५) यांचे १४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, ३ भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. शुभम व रुपेश डहाळे यांचे ते वडील होत.

## माधवराव कदम यांचे निधन



नगर – माळीवाडा भागातील वंरवडे गल्ली येथील रहिवासी माधवराव दत्तात्रय कदम (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ.सतीश कदम व राजेंद्र (भाऊ) कदम यांचे वडील तसेच शिवाजी कदम व माजी नगरसेवक संभाजी कदम यांचे चुलते होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नांतवडे, पुतणे असा परिवार आहे.

## सत्यवान दळवी (मामा) यांचे दुःखद निधन



वाळकी – अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव येथील रहिवासी पोस्टमास्तर सत्यवान कोंडीबा दळवी (मामा) (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुंडेगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा अनिल दळवी, गणेश दळवी, पाच बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## अर्जुनकाका भांड यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – समता कॉलनी, थत्ते मैदान शेजारील रहिवासी अर्जुनकाका लक्ष्मणराव भांड (वय ७१) यांचे १४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ सप्टेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ भाऊ, २ बहिणी, २ मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

# 'आनंदऋषीजी हॉस्पिटल'मध्ये १८ सप्टेंबर रोजी स्त्री रोग व गर्भवती महिला मोफत तपासणी शिबीर

### सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया सुविधा

नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारा संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे १८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत स्त्री रोग, गर्भवती महिला तपासणी आणि सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात गर्भवती महिलांच्या सोनोग्राफी, रक्त तपासणी व इतर सर्व आवश्यक चाचण्या सवलतीच्या दरात केल्या जाणार असून तज्ज्ञांकडून आहार मार्गदर्शन केले जाईल. अनुभवी स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा व डॉ. तृप्ती पाटील रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पिटलमध्ये स्त्री रोगांवर प्रभावी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने शस्त्रक्रियाही करण्यात येतात. या उपचार सुविधांचा रूग्णांना लाभ मिळावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, मूत्राशय काढणे, वंध्यत्व तपासणीसाठी गर्भनलिकेची ट्युबल पेटन्सी, बिजांड पेशींवरील गाठी काढणे, सिझेरियन, गर्भाशयाची पिशवी काढणे, शस्त्रक्रियेद्वारे गर्भाशय तपासणी व उपचार, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय स्वच्छ करणे, दुर्बिणीद्वारे गर्भाशयाची पिशवी काढणे, हिस्टेरोसाल्फिनजिओग्राफी, गर्भाशयाच्या आतल्या अस्तराचा तुकडा तपासणे, गर्भाशय मुखाच्या पेशींची तपासणी असे विविध उपचार व शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जाणार आहेत.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये (संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.). शिबिराचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१– २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

# दुकानातील 'क्लेम मॅनेजरकडून' मालकाची २३ लाखांची फसवणूक

### प्रकार उघडकीस आल्यावर दिली आत्महत्येची धमकी, गुन्हा दाखल

नगर – शहरातील एमआयडीसी परिसरातील एका प्रसिद्ध टायर्सच्या दुकानात काम करणाऱ्या क्लेम मॅनेजरने मालकाचा विश्वासघात करत तब्बल २३ लाख २२ हजार २९३ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ग्राहकांना नियमबाह्य पद्धतीने क्रेडिट नोट्स देणे, बनावट बिले तयार करणे आणि सॉफ्टवेअरमध्ये खोट्या नोंदी करून हा गैरव्यवहार करण्यात आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

याबाबत अजय लक्ष्मीनारायण उपाध्याय (वय ३१, धंदा– व्यवसाय, रा. रोहन मिथिला, विमाननगर, पुणे) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या एमआयडीसी येथील 'मुरली मनोहर ट्रेडिंग कंपनी सीएट कॉन्ट्रॅक्ट' नावाच्या दुकानात आरोपी आशिष रसिकलाल गुंदेचा (रा. शिवम, प्लॉट नंबर २, आनंदधाम जवळ, मार्केट यार्ड, अहिल्यानगर) हा क्लेम मॅनेजर म्हणून कार्यरत होता. आरोपी आशिष गुंदेचा याने १ एप्रिल २०२५ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मालकाचा विश्वासघात केला. प्रत्यक्षात कोणतेही दोषमुक्त टायर्स परत आलेले नसतानाही त्याने ग्राहकांना नियमबाह्य पद्धतीने क्रेडिट नोट्स जारी केल्या, खोटी बिले दाखल केली आणि स्टॉक स्टेटमेंटमध्ये फेरफार केली. इतकेच नव्हे तर दुकानाच्या सॉफ्टवेअरमध्ये खोट्या नोंदी करून मालकाची २३ लाख २२ हजार २९३ रुपयांची फसवणूक केली.

हा सर्व प्रकार लक्षात आल्यानंतर मालक अजय उपाध्याय यांनी याबाबत विचारणा केली असता, आरोपीने त्यांना 'मी आत्महत्या करेन आणि तुमच्यावर खोटी केस करेन' अशी धमकी दिली. अखेर याप्रकरणी १४ सप्टेंबर रोजी रात्री एमआयडीसी पोलिसांत तक्रार नोंदवण्यात आली. पोलिसांनी अजय उपाध्याय याच्या फिर्यादी वरून आशिष गुंदेचा याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(४), ३१६(५), ३१४, ३३६(३), ३४०, ३५१(२) अन्वये ठकबाजीचा गुन्हा दाखल करून त्याला रात्री ११ च्या सुमारास अटक केली आहे. ही कारवाई एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पोलीस उपनिरीक्षक कौटे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अहिल्यानगरमध्ये १७ सप्टेंबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिकतर्फे १७ सप्टेंबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. शिबिरासाठी ०२४१–२३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी.

# हरेगाव येथे १९ सप्टेंबरला 'ख्रिस्ती हक्क संघर्ष परिषद'

### सुजात आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती; समाजाच्या हक्कांसाठी आता निर्णायक लढा





श्रीरामपूर – ख्रिस्ती समाजाच्या विविध प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि भारतीय संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्य, समानता व न्यायाच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी वंचित बहुजन आघाडी, श्रीरामपूर यांच्या वतीने 'ख्रिस्ती हक्क संघर्ष परिषद' आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद १९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, हरेगाव येथे होणार आहे. या परिषदेस वंचित बहुजन आघाडीचे सुजात आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी प्रा. किसन चव्हाण, दिशा पिंकी शेख, उत्कर्षाताई रूपवते, अरुण जाधव, संतोष चोळके, मधुकर साळवे आणि सुनील ब्राह्मणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**धर्मस्वातंत्र्य आणि संविधानिक हक्कांवर होणार मंथन :** ख्रिस्ती समाजाच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी आयोजित या परिषदेत धर्मस्वातंत्र्यावर येणारे निर्बंध, चर्चना बजावण्यात आलेल्या नोटिसा, अल्पसंख्याक समाजावरील अन्याय–अत्याचार, अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांवर एकजूट, तसेच भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेले धर्म, श्रद्धा, उपासना आणि धार्मिक संस्था चालविण्याचे अधिकार यांसह विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

समाजाच्या विविध प्रश्नांवर संविधानिक आणि लोकशाही मार्गाने संघर्ष उभारण्याची पुढील दिशा या परिषदेत निश्चित करण्याबाबतही विचारविनिमय होणार आहे. ख्रिस्ती समाजाच्या हक्कांसाठी विविध घटकांनी एकत्र येऊन अन्यायाविरोधात संघटितपणे आवाज बुलंद करण्याची गरज या परिषदेत अधोरेखित केली जाणार आहे.

**सकल ख्रिस्ती समाजाला एकजुटीचे आवाहन :** या परिषदेस पाद्री, चर्च प्रतिनिधी, धार्मिक संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला तसेच सकल ख्रिस्ती समाजाने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या परिषदेचे आयोजन वंचित बहुजन आघाडी, श्रीरामपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. सकल ख्रिस्ती समाजाने सहभागी होऊन आपल्या हक्कांच्या लढ्याला बळ द्यावे आणि परिषदेला यशस्वी करावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे श्रीरामपूर तालुका अध्यक्ष डॉ. गौतम चित्ते व महासचिव ॲड. अण्णासाहेब मोहन यांनी केले आहे.



**गणरायाचे आगमन आणि आकाशात चंद्र, तारा युती ने वेधलं सर्वांचे लक्ष** सोमवारी सूर्यास्तानंतर ६ वाजून ५५ मिनिटांनी चंद्राच्या जवळ दिसणारी चांदणी प्रत्यक्षात तारा नसून शुक्र किंवा गुरू सारखा एखादा तेजस्वी ग्रह असतो. खगोलशास्त्रात या घटनेला युती म्हणतात. विलोभनीय दृश्य आज सोमवार सायंकाळी अर्धा ते एक तास सर्वांचे लक्ष वेधत होते. (छाया : विजय मते)

# श्रीचक्रधरस्वामींचा ८०६ वा अवतार दिनानिमित्त महानुभाव पंथाच्यावतीने १९ व २० सप्टेंबरला रक्तदान शिबिरासह धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रम



नगर – अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषद व नगर तालुका महानुभाव समितीच्या वतीने भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी यांचा ८०६ वा अवतार दिन महोत्सव १९ व २० सप्टेंबर रोजी साई मुरली लॉन्स, निमसे मळा, पोखर्डी (शेंडी) येथे विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. अवतार दिनानिमित्त रक्तदान शिबिरासह पालखी मिरवणूक, कीर्तन, धर्मसभा, व्याख्यान व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

१९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत रक्तदान शिबिर होणार आहे. त्यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत श्रीकृष्ण मंदिर, शेंडी येथून श्रीचक्रधरस्वामींच्या मूर्तीसह आचार्य, संत, महंत व तपस्विनींची पालखीतून मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी महाआरतीनंतर ह.भ.प. दत्तात्रेय कोरे महाराज, शेंडी यांचे कीर्तन होणार आहे.

२० सप्टेंबर रोजी सकाळी श्रीमूर्तींचे मंगलस्नान, श्रीमद्भगवद्गीता पाठ, ध्वजारोहण व सभागृह उद्घाटनानंतर धर्मसभा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२ वाजता महाआरती व त्यानंतर महाप्रसाद होणार आहे.

या महोत्सवासाठी श्रीगुरुवर्य मामाजी, अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष कवीश्वर कुलाचार्य प.म. आचार्य कारंजेकर बाबा, कार्याध्यक्ष आचार्य वर्धनस्थ बिडकर बाबा तसेच प्रवचनकार आचार्य बाभुळकर बाबा शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जिल्ह्यातील संत–महंत, भक्तमंडळींनी उपस्थित राहून महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानुभाव पंथाच्या वतीने आयोजकांनी केले आहे.

भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी यांच्या अवतारदिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वामींच्या पावन चरणी कोटी कोटी वंदन करून राज्यातील नागरिकांना मंगलमय शुभेच्छा दिल्या आहेत.

# अबुजर शेखची आंतरराष्ट्रीय भरारी

### सीए विद्यार्थी संघटनेच्या इतिहासात पहिल्यांदाच श्रीलंकेतील आंतरराष्ट्रीय वार्षिकात मुलाखत



नगर – अहिल्यानगरच्या सीए विद्यार्थी संघटनेचे सचिव (२०२५–२६) आणि 'लक्ष्य' या आंतरराष्ट्रीय मासिकाचे मुख्य संपादक अबुजर शेख हे बीएनबी मेडिकल डिस्ट्रिब्युटर्सचे संस्थापक समीर शेख यांचे पुत्र असून, त्यांच्या नेतृत्वाखाली 'लक्ष्य' मासिकाच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची आता आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.

'लक्ष्य' मासिकाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाल्यानंतर त्यांच्या प्रवासात आणखी एक ऐतिहासिक टप्पा जोडला गेला आहे. श्रीलंकेतील सीए विद्यार्थी संघटनेच्या 'फ्युजन' या वार्षिकाच्या २२व्या आवृत्तीत अबुजर शेख यांची विशेष मुलाखत प्रकाशित झाली आहे. 'फ्युजन' हे वार्षिक श्रीलंका तसेच शेजारील देशांतील असामान्य प्रतिभा, उल्लेखनीय कार्य आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी ओळखले जाते.

सीए विद्यार्थी संघटना, श्रीलंकेचे अध्यक्ष थिलिना पिन्सारा आणि 'फ्युजन'चे संपादकीय प्रमुख नास्बी अहमद यांनी अबुजर शेख यांची विशेष मुलाखत घेतली असून, ही मुलाखत 'फ्युजन'च्या २२ व्या आवृत्तीत प्रकाशित करण्यात आली आहे. विशेष भारतामधून प्रथमच अबुजर शेख यांना स्थान मिळाले आहे. तसेच, सीए विद्यार्थी संघटनेच्या इतिहासात प्रथमच एखाद्या विद्यार्थ्याची मुलाखत आंतरराष्ट्रीय स्तरावरील वार्षिकात प्रकाशित झाली आहे.

अहिल्यानगरातून सुरू झालेला हा प्रवास आता भारताच्या सीमा ओलांडून श्रीलंकेपर्यंत पोहोचला असून, 'लक्ष्य'ची ओळख आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उमटली आहे. अहिल्यानगरच्या मातीतून सुरू झालेल्या या उल्लेखनीय प्रवासाची आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेली दखल ही केवळ अहिल्यानगरसाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### चष्मा टाळण्याचे उपाय

लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सगळ्यांनाच चष्मा लागत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या रोजच्या सवयी बदलल्या आहेत. आपण दिवसभर भ्रमणध्वनी, संगणक आणि दूरचित्रवाणीचा पडदा पाहत असतो. त्यामुळे डोळ्यांवर सतत ताण येतो आणि दृष्टी हळूहळू कमी होऊ लागते. जर वेळीच काळजी घेतली तर चष्मा लागणे टाळता येते. सगळ्यात पहिला उपाय म्हणजे डोळ्यांना नियमित विश्रांती देणे. आपण जेव्हा जवळचे पाहतो तेव्हा डोळ्यांच्या आतील स्नायू आकुंचन पावतात. जर तासनतास असेच पाहत राहिलो तर ते स्नायू थकून जातात. म्हणून दर वीस मिनिटांनी वीस सेकंद लांबवर पहावे. मध्ये मध्ये डोळे बंद करून एक मिनिट शांत बसावे. सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्यापूर्वी डोळे थंड पाण्याने धुवावेत. यामुळे डोळ्यात गेलेली धूळ निघून जाते आणि डोळे ताजे होतात. दुसरा महत्वाचा भाग म्हणजे पाहण्याचे योग्य अंतर आणि उजेड. पुस्तक वाचताना ते डोळ्यांपासून किमान एक फूट लांब धरावे. झोपून किंवा चालत्या गाडीत वाचन करू नये. अभ्यास करताना किंवा काम करताना मागून उजेड येईल अशी बैठक असावी. अंधारात भ्रमणध्वनी पाहणे डोळ्यांसाठी खूप हानिकारक आहे. संगणकाचा पडदा नेहमी डोळ्यांच्या पातळीपेक्षा थोडा खाली असावा.तिसरा उपाय म्हणजे योग्य आहार. डोळ्यांना चांगले ठेवण्यासाठी आपल्या जेवणात अ जीवनसत्व असलेले पदार्थ हवेत. गाजर, पपई, आंबा, हिरव्या पालेभाज्या, आवळा यामध्ये हे जीवनसत्व भरपूर असते. बदाम, अक्रोड आणि जवस खाल्ल्यानेही दृष्टी तीक्ष्ण होते. रोज सकाळी मोड आलेले धान्य खावे. भरपूर पाणी प्यावे म्हणजे डोळ्यांना लागणारा ओलावा टिकून राहतो. शेवटचा आणि सगळ्यात महत्वाचा उपाय म्हणजे झोप आणि व्यायाम. रोज सात ते आठ तास शांत झोप घेणे गरजेचे आहे. झोप कमी झाली तर डोळे लाल होतात, जड होतात आणि दृष्टी कमजोर होते. सकाळी लवकर उठून हिरवळीवर चालावे आणि लांबवर असलेली झाडे पहावीत. अनुलोम विलोम आणि डोळ्यांचे व्यायाम जसे की डोळे गोल फिरवणे, वर खाली पाहणे यामुळे डोळ्यांचे स्नायू बळकट होतात. जर हे सर्व नियम रोज पाळले तर वय झाले तरीही दृष्टी चांगली राहते आणि चष्मा लागण्याची वेळ येत नाही.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### पान गुलकंद मोदक

**साहित्य** : खवा १ वाटी, मिल्क पावडर १/२ वाटी, पिठी साखर १/२ वाटी, खाण्याचा हिरवा रंग १ चिमूट, नागेलीची पाने ४ मध्यम, पान मसाला २ चमचे, गुलकंद २ चमचे, बारीक चिरलेली बडीशेप १ चमचा, तूप १ चमचा, सजावटीसाठी बारीक चिरलेला पिस्ता १ चमचा

**कृती** : नागेलीची पाने धुवून बारीक चिरून घ्या. मिक्सरमध्ये चिरलेली पाने, थोडे दूध आणि हिरवा रंग घालून बारीक वाटून घ्या. कढईत तूप गरम करून त्यात खवा घालून २ मिनिट परतून घ्या. त्यात मिल्क पावडर आणि पिठी साखर घालून मिश्रण एकजीव करा. आता त्यात वाटलेली पानाची पेस्ट घालून मध्यम आचेवर घट्ट होईपर्यंत परतत राहा. मिश्रण कढई सोडू लागले की गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. सारणासाठी एका वाटीत गुलकंद, पान मसाला, बडीशेप आणि बारीक चिरलेला सुकामेवा मिसळून घ्या. थंड झालेल्या पानाच्या मिश्रणाचे छोटे गोळे करा. प्रत्येक गोळ्याला मोदकाच्या साच्यात घालून मध्ये थोडी जागा करून गुलकंदाचे सारण भरा. वरून परत थोडे मिश्रण लावून साचा बंद करून हलक्या हाताने दाबा. तयार मोदक साच्यातून काढून वर पिस्त्याचे काप लावा. तयार पान गुलकंद मोदक थंड करून सर्व्ह करा.

## वास्तू

### जेवणाचे टेबल

डायनिंग टेबल हे अन्नपूर्णेचे स्थान मानले जाते. टेबल नेहमी रिकामे असेल तर घरात अन्नाची कमतरता येते असे मानले जाते. टेबलावर नेहमी ताजी फळे, सुकेमेवे असे काही ना काही ठेवलेले असावे, याने घरात बरकत राहते. ताजी फळे ही समृद्धी आणि आरोग्याचे प्रतीक आहेत.

## सौंदर्य

तणाव असताना ओठ चावू नयेत. ओठ सारखे दातांनी चावल्याने ओठांचा नैसर्गिक गुलाबी रंग जाऊन ते काळपट होतात.

## सल्ला

मिरचीचा ठसका हाताला लागला तर हातावर दही चोळावे, साबणाने जळजळ वाढते आणि हाताची त्वचा राठ होते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, विशाखा १७।२३, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मनातील इच्छा पूर्ण होईल. आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ** : धनलाभ होण्याची शक्यता आहे. जुन्या मित्राची भेट होईल.

**मिथुन** : कामात यश मिळेल. दिवस उत्साहात जाईल.

**कर्क** : कौटुंबिक सुख मिळेल. प्रवास घडण्याची शक्यता आहे.

**सिंह** : मान सन्मान वाढेल. नवीन ओळखी होतील.

**कन्या** : अडकलेले पैसे परत मिळतील. तब्येत चांगली राहील.

**तूळ** : जोडीदाराची साथ मिळेल. व्यापरात फायदा होईल.

**वृश्चिक** : शत्रूवर विजय मिळेल. मन प्रसन्न राहील.

**धनु** : संततीकडून आनंद वार्ता मिळेल. धार्मिक कार्य घडेल.

**मकर** : नोकरीत बढती मिळेल. वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद मिळतील.

**कुंभ** : अचानक धनप्राप्ती होईल. इच्छा पूर्ण होईल.

**मीन** : कला क्षेत्रात यश मिळेल. दिवस आनंदात जाईल.

## शब्दगंध क्र. ७५१७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** - १) काख ५) किरकोळ नसलेले; घाऊक ७) विश्व; दुनिया ८) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १०) दाट झाडी असलेली जागा ११) दुसऱ्यावर अवलंबून असलेला १३) पगार १४) जुना; प्राचीन १६) एक फूल १७) दाट केस असलेला एक जंगली प्राणी; अस्वल १८) सोबती; सहकारी १९) जंगल संपत्ती २२) न टळणारे २३) स्त्रियांची राहण्याची जागा (राजदरबारी स्त्रियांची); जनानखाना

**उभे शब्द** :- १) गोंधळाची स्थिती; अराजक; बेबंदशाही २) आकाश; नभ; अंबर ३) वाईट सवय; खोड ४) गावात तयार होणारे ६) गुणी; कुशल ९) खेळातील पाळी; मनातील डंख ११) पडणे; नाश; पात १२) दशानन; रावण १३) बांबू वर्गातील एक वनस्पती १५) मध्यम प्रतीचा १६) अत्यंत प्रेमातली स्त्री २०) निषध देशाचा राजा; दमयंतीचा पती २१) हा प्राणी पाण्याच्या बाहेर जिवंत राहू शकत नाही

### शब्दगंध क्र. ७५१६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | वि | र | त | ■ | अ | मु | क |
| ■ | ना | म | क | र | ण | ■ | |
| पा | श | ■ | ला | ■ | कु | ऱ्हा | ड |
| रं | क | ■ | दू | ■ | ची | ■ | ■ |
| प | ■ | चि | ■ | स | दा | शि | व |
| रि | का | मा | ■ | ह | र | ■ | व |
| क | ल | ■ | का | का | ■ | दि | वा |
| ■ | वा | टे | क | री | ■ | न | स |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : आयुष्यात वादळ येणे पण गरजेचे आहे, तेव्हाच कळते कोण हात धरून चालतोय आणि कोण हात सोडून पळतोय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपल्याला वास आणि चव कशी येते?

आपण रोज कितीतरी वेळा वास घेतो आणि चव घेतो पण कधी विचार केला आहे का की ही क्रिया घडते तरी कशी. एखाद्या फुलाचा सुगंध किंवा आईच्या हातच्या आमटीची चव ही फक्त नाक आणि जिभेचे काम नसून त्यामागे आपल्या मेंदूची एक अद्भुत आणि खूप वेगाने चालणारी प्रयोगशाळा असते. या दोन्ही संवेदना ज्याला आपण घ्राणेंद्रिय आणि रसनेंद्रिय म्हणतो त्या एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत.सुरुवात करूया वासापासून. आपण जेव्हा श्वास घेतो तेव्हा हवा नाकातून आत जाते. आपल्या नाकपुड्यांच्या अगदी वरच्या टोकाला एक छोटेसे क्षेत्र असते त्याला घ्राण उपकला असे म्हणतात. या क्षेत्राचा आकार फक्त एका नाण्याएवढा असतो पण तिथे जवळजवळ एक कोटीपेक्षा जास्त वास ओळखणाऱ्या पेशी दाटीवाटीने बसलेल्या असतात. या पेशींच्या वर बारीक केसांसारखे सिलिया असतात. हवेत उडणारे वासाचे रेणू हे खूपच सूक्ष्म असतात ते श्लेष्मल त्वचेवर विरघळतात आणि या केसांना चिकटतात. प्रत्येक वासाच्या रेणूचा आकार वेगळा असतो जसे कुलुपाला वेगळी किल्ली लागते तसे प्रत्येक रेणू वेगळ्या पेशीला सक्रिय करतो. जसे ही पेशी सक्रिय होते तसे ती एक विद्युत संदेश तयार करते.

हा संदेश घ्राण चेता तंतूंमधून थेट मेंदूच्या घ्राण कंद नावाच्या भागात जातो. हा भाग मेंदूच्या अगदी पुढच्या भागात असतो. इथून हा संदेश मेंदूच्या आणखी खोल भागात म्हणजे जिथे आपल्या आठवणी आणि भावना साठलेल्या असतात तिथे जातो. म्हणूनच एखादा वास आला की आपल्याला लगेच जुनी आठवण येते.

एखाद्या अत्तराचा वास आला की आपल्याला एखादी व्यक्ती आठवते याचे कारण हेच आहे की वासाचा संबंध थेट आपल्या स्मृती केंद्राशी जोडलेला आहे. माणूस जवळजवळ दहा हजार वेगवेगळे वास ओळखू शकतो असे विज्ञान सांगते.आता चवीकडे वळूया. चव ओळखण्याचे मुख्य काम जिभेचे आहे पण फक्त जिभेचेच नाही तर टाळू आणि घशाच्या काही भागावरही चव ओळखणाऱ्या पेशी असतात. जिभेवर आपल्याला जे छोटे छोटे दाणे दिसतात त्यांना पॅपिली म्हणतात आणि त्यांच्या आतमध्ये चव कलिका लपलेल्या असतात. एका माणसाच्या जिभेवर दहा हजारांपेक्षा जास्त चव कलिका असतात आणि प्रत्येक कलिका सात ते दहा दिवसांनी बदलत असते म्हणजे नवीन तयार होत असते. जेव्हा आपण अन्न तोंडात टाकतो तेव्हा लाळ त्या अन्नाला विरघळवते. त्या विरघळलेल्या रसातील रसायने या चव कलिकांच्या संपर्कात येतात. या कलिकांमध्येही वेगवेगळ्या चवींसाठी वेगवेगळ्या प्रकारचे रिसेप्टर्स असतात. गोड चव साखरेमुळे समजते, खारट चव मिठातील सोडियममुळे, आंबट चव आम्लामुळे, कडू चव आपल्या शरीराला अपायकारक असणाऱ्या अनेक वनस्पतींमधील रसायनांमुळे समजते म्हणून निसर्गाने कडू चव आपल्याला थोडी जास्तच तीव्रतेने जाणवेल अशी व्यवस्था केली आहे जेणेकरून आपण विषारी पदार्थ खाणार नाही.

पाचवी चव म्हणजे उमामी ही जपानी शब्द आहे याचा अर्थ चविष्टपणा. ही चव आपल्याला टोमॅटो, चीज, मशरूम आणि सोया सॉस यासारख्या प्रोटीन जास्त असलेल्या पदार्थांमध्ये लागते.या दोन्ही क्रिया स्वतंत्र वाटत असल्या तरी मेंदूमध्ये त्या एकाच ठिकाणी एकत्र येतात. यालाच फ्लेवर असे म्हणतात. आपण जेव्हा अन्न चावतो तेव्हा त्या अन्नाचे वासाचे रेणू तोंडाच्या मागील बाजूने नाकाच्या आतल्या भागात जातात याला पश्च घ्राण मार्ग म्हणतात. त्यामुळे जिभेला फक्त पाच चवी समजल्या तरी नाकामुळे आपल्याला बिर्याणी, गुलाबजाम आणि वरण भात यातला फरक समजतो. जर नाक बंद असेल तर मेंदूला वासाची माहिती मिळत नाही आणि मग सगळे पदार्थ एकाच चवीचे म्हणजे बेचव वाटू लागतात. सर्दी झाल्यावर जेवणाची चव का जात नाही याचे हेच कारण आहे.शेवटी हे सगळे संदेश मेंदूच्या एका खास भागात ज्याला इन्सुला आणि ऑर्बिटोफ्रंटल कॉर्टेक्स म्हणतात तिथे एकत्र येतात. तिथे मेंदू ठरवतो की हा पदार्थ चांगला आहे की वाईट, खावा की थुंकून टाकावा. म्हणूनच वास आणि चव ही केवळ जिभेची आणि नाकाची गोष्ट नसून ती आपल्या जगण्याची, सुरक्षित राहण्याची आणि आनंद घेण्याची एक सुंदर यंत्रणा आहे.

### रागाचा राक्षस

एक होता राजू. राजू हुशार होता, अभ्यासात चांगला होता, सगळे त्याचे कौतुक करायचे. पण त्याच्यात एक मोठा दोष होता, त्याला खूप लवकर राग यायचा. छोट्या छोट्या गोष्टीवरून तो भांडायचा. एकदा शाळेत त्याचा मित्र अमितने चुकून त्याच्या वहिवर शाई सांडवली. राजू इतका रागावला की त्याने अमितची वहीच फाडून टाकली. शिक्षकांनी राजूला खूप समजावले पण राजू ऐकायचा नाही.

त्या रात्री राजू झोपला असताना त्याला एक विचित्र स्वप्न पडले. त्याने पाहिले की त्याच्या पाठीवर एक छोटा काळा राक्षस बसला आहे. तो राक्षस सारखा त्याच्या कानात सांगत होता, रागाव... भांड... तोडून टाक...राजू घाबरून म्हणाला, तू कोण आहेस?

राक्षस हसून म्हणाला, मी राग आहे. तू जेव्हा जेव्हा रागवतोस तेव्हा मी मोठा होतो. तू जितका जास्त रागवशील तितका मी जास्त ताकदवान होईन आणि एक दिवस मी तुला पूर्णपणे गिळून टाकेन. राजूने आरशात पाहिले तर खरंच तो राक्षस मोठा होत चालला होता. राजूने विचारले, तुला कसे घालवायचे?

राक्षस घाबरून म्हणाला, मला एकच गोष्ट आवडत नाही... शांतता. तू जर १० पर्यंत आकडे मोजलेस, मोठा श्वास घेतलास आणि शांतपणे बोललास तर मी छोटा होतो.

दुसऱ्या दिवशी शाळेत पुन्हा तसेच झाले. खेळताना एका मुलाने राजूला धक्का दिला. राजूला पुन्हा राग आला आणि त्याला पाठीवरचा राक्षस आठवला. त्याने लगेच डोळे बंद केले, १ ते १० आकडे मोजले आणि मोठा श्वास घेतला. आश्चर्य म्हणजे त्याचा राग निघून गेला. त्याने त्या मुलाला शांतपणे सांगितले, अरे सांभाळून खेळ. त्या दिवशी राजूने पाहिले की पाठीवरचा राक्षस थोडा छोटा झाला आहे. असे रोज रोज करत एक महिन्यात तो राक्षस मुंगी एवढा छोटा झाला आणि एक दिवस नाहीसा झाला. आता राजू सगळ्यांचा आवडता झाला. त्याचे मित्र वाढले कारण आता तो भांडत नव्हता.

तात्पर्य : राग हा आपल्या पाठीवर बसलेला राक्षस असतो. तो दुसऱ्याचे नाही तर आपलेच नुकसान करतो

## आत्मशक्ति



### वेळेची किंमत

थोडाफार वेळ वाचतो, त्याचा सदुपयोग व्हावा, असे आम्हाला वाटते.लाकूडतोड्यासारखे, आम्ही आमचा बहुमोल वेळ वाया घालवू इच्छित नाही.तर मग चला! आपल्या दिवसाच्या २४ तासांचा हिशोब बघू या! खालीलप्रमाणे त्याचा तपशील मांडता येईल. तर मग आम्ही आत्मिक शोधासाठी (ध्यानधारणेसाठी) वेळ कसा काढणार? आपल्या झोपेची वेळ कमी करून स्वास्थ्यासंबंधित संशोधनानुसार असे सिद्ध झाले आहे की, ध्यानधारणा केल्याने व मन लावून प्रार्थना केल्याने आम्हाला आराम आणि शांतता लाभते.तेव्हा आम्ही आणखी वेळ कोठून काढावा? उद्योगधंद्याची वेळ तर निश्चितच असते. खाणे-पिणे, तयार होणे अथवा घर-गृहस्थीचा वेळ कमी-जास्त करता येत नाही. तेव्हा वेळ उरतो तो मनोरंजनाचा दीड तासांचा! तेव्हा झोपेतून काढलेल्या एक-दोन तासात, ह्यातील काही वेळेची जोड करू शकतो. आम्ही जर आपल्या आत्मिक कामासाठी रोज २ तास खर्च केले, तर आयुष्यात ६ वर्षे ह्यासाठी काढू शकतो. आम्ही महाविद्यालयात जातो किंवा एखाद्या व्यवसायाच्या प्रशिक्षणासाठी जो वेळ देतो त्यामानाने ६ वर्षांचा काळ काही विशेष नाही. जर आत्मज्ञानाचा खजिना वास्तव स्वरूपात मिळवायचा असेल, तर ६ वर्षांचा हा आत्मसंशोधनासाठी राखून ठेवलेला काळ काही खूप नाही. ह्यासाठी जेवढा जास्त वेळ आम्ही घालवू तेवढे अधिक चांगले!अभ्यास आपल्या दैनंदिन कामांची यादी करा! ध्यानधारणा करण्यासाठी वेळ निश्चित

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ऊर्जाही पोहोचल

सुरेश ओबेरॉय : पण जर मी बरोबर आहे असं मी समजतो तर ते तरंग मला मिळणार नाहीत.

शिवानीदीदी : इतरांकडून येणारे तरंग तुम्ही रोखू शकत नाही. त्यांना सकारात्मक ऊर्जेने प्रतिसाद देण्याचा पर्याय तुम्ही निवडू शकता. नाही तर, मला पूर्वपदावर यायला जेवढा जास्त वेळ लागेल तेवढा वेळ मी तुमच्याबद्दल नकारात्मक विचार करत राहीन.

सुरेश ओबेरॉय : ज्याच्यावर टीका होतीय त्याला शक्ती कमी झाल्यासारखं वाटेल. दुसऱ्या व्यक्तीची ऊर्जा का कमी होईल?

शिवानीदीदी : एखाद्याने आपल्याला आशीर्वाद दिला तर काय होतं?

सुरेश ओबेरॉय : आपल्याला आनंद होतो.

शिवानीदीदी : बरोबर. त्याचप्रमाणे, जर कोणी आपल्याला आशीर्वादाच्या विरुद्ध ऊर्जा पाठवत असेल तर ती ऊर्जाही आपल्यापर्यंत पोहोचेल पण तो खूप सूक्ष्म, तरल अनुभव असेल.

सुरेश ओबेरॉय : म्हणजे एक कार्मिक खातं निर्माण होईल.

शिवानीदीदी : हो आणि ते सतत सुरू राहील. अनेकदा आपल्याला असं वाटतं की, जर कोणी दुखावलं गेलं तर तो त्याचा प्रॉब्लेम आहे कारण छोट्या छोट्या गोष्टींवर दुखावलं जाण्याचा त्याचा स्वभाव आहे. असा विचार करण्याऐवजी, त्याला बरं करण्याची जबाबदारी आपण घेऊ शकतो. नाही तर नाती कशासाठी असतात? नातं म्हणजे, एकमेकांचे संस्कार समजून घेणं आणि एकमेकांसाठी उपलब्ध असणं.

सुरेश ओबेरॉय : यालाच प्रेमळ अस्तित्व म्हणतात.

शिवानीदीदी : हो, ज्या क्षणी आपण कुटुंबातील दुखावल्या गेलेल्या माणसाकडे प्रेम पाठवतो, त्या क्षणी त्या वेदनेतून बाहेर पडणं त्यांच्यासाठी सोपं होतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पप्पू देवाला : देवा मला १०० कोटी दे!

देव : १०० कोटीचं काय करशील?

पप्पू : आधी दे, मग मी युट्युबवर व्हिडिओ बनवेन '१०० कोटी आल्यावर काय करावे!'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* WHO ने २०२५ मध्ये कोणत्या आजाराला जागतिक महामारीतून वगळले?

– COVID-19

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी : जेव्हा स्त्री बीजाशी पुरुष बीजाची जुळणी होते व त्यात आत्म्याचा प्रवेश होतो त्यालाच 'गर्भ' असे म्हणतात. बीज जर शुद्ध असेल, तर त्यातून निर्माण होणारे मूल हे देखील तेजस्वी, निरोगी, आरोग्यसंपन्न, उत्साही, बुद्धिमान व संस्कारक्षम असते. भावी माता-पित्यांनी पंचकर्मातून शरीरशुद्धी करून त्यातून बीजशुद्धी करून घ्यावी; यामुळे आपल्या कुटुंबामध्ये वंशपरंपरागत जे आजार असतात ते आजार आपल्या बाळामध्ये येण्याचे प्रमाण कमी होते. गर्भात सुसंस्कारित आत्म्याचा प्रवेश होण्यासाठी कोणते मंत्र म्हणावेत यासाठी मार्गदर्शन केले जाते. भावी माता-पित्याने

### गर्भसंस्कार केंद्राचे प्रयोजन

सात्विक आहार कोणता घ्यावा? ध्यान, धारणा, प्राणायाम, योगासने, ॐकार यातून आचार व विचार सात्विक कसे ठेवावे याविषयी मार्गदर्शन केले जाते. जर बीजावर व आत्म्यावर चांगले संस्कार केले, तर तुमचे बाळ नक्कीच वैद्य, अभियंता होईलच, पण त्या पलीकडेही जाऊन जगातील उच्च असे स्थान प्राप्त करेल.बच्चो तुम तकदीर हो, कल के हिंदुस्तान की। बापू के वरदान की, नेहरू के अरमान की।आजच्या बालकांवरच आपल्या भारत देशाचे भवितव्य अवलंबून आहे. या भारत देशातील मूल शक्तिमान, तेजस्वी, बुद्धिमान, दीर्घायुषी, आरोग्यपूर्ण जन्माला येण्यासाठी गर्भसंस्काराची गरज पडते. जन्मल्यानंतर केलेल्या संस्कारापेक्षा गर्भात असताना केलेले संस्कार जास्त उपयोगी ठरतात. जीवनामध्ये गर्भावस्थेचा काळ हा काही वारंवार येत नाही. एकदा किंवा फारतर दोन वेळेला येतो. म्हणूनच भावी मातेने गर्भधारणेच्या पहिल्या तीन महिन्यात स्वस्थ आणि व्यवस्थित शरीरासाठी संस्कार करावेत. दुसऱ्या तीन महिन्यात म्हणजे ३ ते ६ महिन्यात गर्भाचे मानसिक **(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



जय आनंद महावीर युवक मंडळाच्या गणपतीची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली.

# विघ्नहर्ता गणरायाने दुष्काळाचे सावट दूर करावे

**सचिन मुनोत यांचे प्रतिपादन; जय आनंद महावीर युवक मंडळाच्या गणपतीची विधीवत प्रतिष्ठापना**

नगर – नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने दरवर्षी प्रमाणे यंदाही गणेशोत्सवात डीजेला फाटा देत गणरायाचे पारंपरिक पद्धतीने उत्साहात स्वागत केले. सिद्धेश मोटर्सचे संचालक सचिन मुनोत यांच्या हस्ते श्रींची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी मंडळाच्या चांदीच्या गणेश मूर्तीची व उत्सव मूर्तीची पूजा व आरती करण्यात आली.

यावेळी गांधी कुरिअरचे संचालक तथा जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, सेक्रेटरी आनंद मुथा, संजय मुनोत, उपाध्यक्ष चेतन गुगळे व कुंतीलाल राका, नितीन मुनोत व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी लाडक्या गणरायाला दुष्काळ मुक्ती आणि चांगल्या पावसासाठी साकडे घातले. यावेळी संतोष गांधी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

सचिन मुनोत म्हणाले, मंडळाची पंचवीस वर्षांची वाटचाल खऱ्या अर्थाने आदर्शवत आहे. उच्च परंपरा, संस्कृतीचे जतन करत धार्मिक कार्यक्रम आणि अखंड चालू असलेले सामाजिक कार्य या मंडळाचे वैशिष्ट्य आहे. शहराची बाजारपेठ असलेल्या नवीपेठ परिसरात येणाऱ्या गणेश भक्तांसाठी या मंडळाचा गणेशोत्सव आकर्षण असतो. ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक विषयांवरील भव्य देखावे समाजाचे प्रबोधन करणारे असतात. गणेशोत्सवासह वर्षभर इतर सामाजिक उपक्रमात ही सर्व सभासद हिरीरीने सहभाग नोंदवतात. यावर्षी पावसाने ओढ दिल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. परंतु गणपती बाप्पा सर्व विघ्ने दूर करेल. चांगला पाऊस होऊन दुष्काळाने रूपांतर सुजलाम सुफलाम महाराष्ट्रात होईल असा आशावाद मुनोत यांनी व्यक्त केला.

संतोष गांधी म्हणाले, नगरच्या सार्वजनिक गणेशोत्सवात मंडळाने आदर्श निर्माण केलेला आहे. मंडळाचे सभासद धार्मिक वृत्तीचे आणि सेवाभावी आहेत. त्यामुळे या मंडळाचा गणेशोत्सव सर्वांचे आकर्षण असतो. लोकमान्य टिळकांना अभिप्रेत समाजाला एकत्र आणून प्रबोधन करणारा उत्सव मंडळ साजरा करत असते.

शैलेश मुनोत म्हणाले, पंचवीस वर्षांपूर्वी नवीपेठ भागातील दोन मंडळांचे विलीनीकरण करून मंडळाची स्थापना करण्यात आली. यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण असून विविध सामाजिक उपक्रम राबवून हे वर्ष संस्मरणीय करण्याचा प्रयत्न आहे. मंडळाने नेहमीच पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा केला आहे. यात सर्वांना सामावून घेतले जाते. उत्सव काळात गणेश भक्तांचे विविध विषयांवर प्रबोधन केले जाते. यावर्षी मंडळाने स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित भव्य दिव्य देखाव्याचे नियोजन केले आहे. सर्व गणेशभक्तांना सुरक्षित व चांगल्या वातावरणात उत्सवाचा आनंद घेत देखावा पाहता येण्यासाठी मंडळाचे सदस्य परिश्रम घेत आहेत. हेमंत मुथा यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अहं विसरायला हवा

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




माणसं रोज पैशाचा हिशेब करतात. नाही लागला तर हैराण होतात । हरवलेला ओढ घाबरे होतात. कुणी पैसे बुडविले, तर त्याला शिव्याशाप देतात. पैसा वाया गेला पिणं सोडतात व झोपेलाही अंतरतात. अरे माणसा, आयुष्याचा का नाही करीत असा केलेस तर पैसा अगणित, पण आयुष्य तर किती मर्यादित।

अगदी कमाल झाली तर शंभर वर्षाचं आयुष्य लाभणार. त्यातलं अर्ध झोपेत चार अर्ध्यातलं अर्धे बालपण आणि लुळं पांगळं म्हातारपण यात संपणार. उरलेल्यांत कुणाचा मृत्यू कुणाचां विरह, तर काही मनस्पाप । दुसऱ्यांची चाकरी करताना ते मिळे भाकरी। नोकरीपायी येतेच लाचारी। मग पाण्याचा बुडबुडा फुटावा तसं पटकन सरत एकदम एका क्षणी. कुठलं सुख मग माणसाला? आहे का उरलेला एखादा क्षण उपभोगायला ? पण माणूस कुठंय तयार त्याचा विचार करायला? तो अहंकारातच बुडाले आणि संपत्तीच्या मागं लागलेला ।

जीव जन्माला येईपर्यंत त्या सनातन चैतन्याशी एकरुप असल्याचं नातं सांगतो म्हणतो, तोच मी म्हणून ठरवून बोलतो. पण जन्माला येताच त्या नात्याला तो विसरला आपण कोण बरं ठरतो? कोवहं मी कोण आहे? म्हणून संभ्रमात पडतो । स्वत:ची ओढ म्हणून झटतो. दिवसामागून दिवस गेले की त्याला अस्तित्वाचं प्रचंड भान आलं. अहंकारानं वेढलं तो आता सोहं किंवा कोहंची भाषा बोलत नाही. तो नेहमी अहं मीच आणि मीच। चैतन्याला विसरणं, जन्माला येईपर्यंत अनेक संकट कोसळ प्रत्येक अपघातातून वाचणं, हीच त्या माणसाला वाटतात लाख लाख भूषणं नंतर संप यांच्या मागं लागणं, ही दुर्दैवाची लक्षणं, अरे माणसा, इकड जरा तरी लक्ष देणें। ही एक इंग्रजी गोष्ट आहे. कुणीतरी तिथं जाणं आपापसात आपलीच बढाई सांगत होते. व्यवसाय सगळ्यात जुना. मलाच तुमच्यापेक्षा श्रेष्ठ माना. असं म्हणत होते.

कोण रे तु असा ? मी धर्मगुरु चर्चचा. तू कोण मोठा? तुझा व्यवसाय कसा सर्वात जुना?

माणूस माझ्यामुळेच प्रार्थना करायला शिकला. देवाचे आभार मानू लागला. दुसरा एकदम उसळून म्हणाला, म्हणून का तुझा धंदा जुना ?

मी सर्जन शस्त्रक्रिया करणारा. माझा व्यवसाय तुझ्यापेक्षा जुना. कारण ईश्वराने केली पहिली सर्जरी. एका बरगंडी कापून काढली. त्यापूर्वी होती सर्वत्र बजबजपुरी. त्यावर तिसरा म्हणाला, अरे मग तुझा व्यवसाय सर्वात जुना कसला ? मग तर माझाच सर्वात जुना ठरला.

तुझा ? तर काय? अहो, ही बजबजपुरी हाच तर मुद्दा मोलाचा. अहो, ही केली कुणी, तर धंदानं तेव्हा तो याही पूर्वीचा किनई ?

तुम्ही कोण हो असे बहुगुणी ?

तो म्हणाला, आम्ही राजकारणी.

– किशोर गांधी

# स्नेहबंध फौंडेशनतर्फे नगरमध्ये जिल्हास्तरीय गौरी आरास स्पर्धा




नगर – 'स्नेहबंध' फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय उत्कृष्ट गौरी आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे महिला सशक्तिकरण, पर्यावरण, पाणी बचत, प्लास्टिकमुक्ती हे विषय ठेवण्यात आले आहेत. या विषयाला अनुसरून स्पर्धकांनी आपल्या गौरी–गणपतीच्या समोर केलेल्या देखाव्याचा अर्ध्या मिनिटाचा व्हिडीओ व ३ ते ४ फोटो स्नेहबंध सोशल फाउंडेशनकडे सादर करावा.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कुटुंबातील स्पर्धकांनी संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबरसह संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे ८७९३ १९१९१९ या क्रमांकावर १९ सप्टेंबर पर्यंत पाठवावेत.

अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून पहिल्या तीन आराशींना गौरवण्यात येणार आहे. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे. स्पर्धा अहिल्यानगर साठी आहे.

# रामकरण सारडा विद्यार्थीगृहात श्री गणेशाची स्थापना



हिंद सेवा मंडळाच्या रामकरण सारडा विद्यार्थीगृहात उद्योजक पंकज झंवर यांच्या हस्ते सपत्नीक श्री गणेशाची स्थापना व पूजन करण्यात आले. याप्रसंगी अजित बोरा, बजरंग दरक आदी.

नगर – सालाबाद प्रमाणे हिंद सेवा मंडळाच्या रामकरण सारडा विद्यार्थी गृहात उद्योजक पंकज सत्यनारायण झंवर यांच्या हस्ते सपत्नीक श्री गणेशाची स्थापना व पूजन करण्यात आले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यास विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी अजित बोरा यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रामकरण सारडा विद्यार्थी गृहात श्री गणेशाची स्थापना व पूजनाचा हा सोहळा अत्यंत आनंददायी आणि भक्तिमय वातावरणात पार पडत आहे. विघ्नहर्ता श्री गणरायाच्या कृपेने सर्व विद्यार्थी, शिक्षक व संस्थेच्या प्रगतीसाठी मंगलमय वातावरण निर्माण होवो, अशी प्रार्थना करतो. विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांना योग्य शिक्षण, संस्कार व मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी होत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. श्री गणेशाच्या आशीर्वादाने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य व यश लाभो, अशी शुभेच्छा त्यांनी व्यक्त केली.

श्री गणेशाची आरती पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी अजित बोरा, बजरंग दरक, राजेश बजाज, सतीश लोढा, सौ. संगीता बजाज, सुशील जाजू, पुरुषोत्तम झंवर, अभिजीत बिहाणी, वस्तीगृहाचे अधीक्षक बंडू भोसले आदी उपस्थित होते.

# श्रीगणेशाला दुर्वा का वाहिल्या जातात?

## २१ दुर्वांचे गणित आणि त्यामागील अद्भूत जीवनविज्ञान

**गणपतीच्या उपासनेतील अत्यंत जिव्हाळ्याच्या, परंतु तितक्याच गूढ विषय – श्रीगणेशाला दुर्वा का वाहिल्या जातात?**

पूजेच्या ताटात सोन्या–चांदीचे अलंकार असोत, सुवासिक अत्तर असो वा मोत्यांचे हार; गणपती बाप्पा या कशानेही तृप्त होत नाहीत, जेवढे ते शेताच्या बांधावर किंवा रस्त्याच्या कडेला सहज उगवणाऱ्या साध्या हिरव्यागार दुर्वेने प्रसन्न होतात. 'दूर्वांकुरान् समर्पयामि' हा मंत्र उच्चारून जेव्हा आपण गणरायाला दुर्वांची जुडी अर्पण करतो, तेव्हा त्यामागे केवळ एक रूढ धार्मिक विधी नसतो, तर त्यामागे मानवी शरीरशास्त्र, मानसिक शांती, निसर्गाशी तादात्म्य आणि दुर्धर तापाचे शमन करणारे अगाध विज्ञान दडलेले असते.



गणेश पुराणात दुर्वा अर्पण करण्यामागे 'अनलासुर' नावाच्या राक्षसाची कथा येते. कथेनुसार, अनलासुर नावाचा एक अत्यंत भयंकर दैत्य त्रिलोकात हाहाकार माजवत होता. त्याला भगवान शंकरांचा वरदानरूपी आशीर्वाद होता की विश्वातील कोणतेही शस्त्र, अस्त्र, मनुष्य, देव किंवा दानव त्याचे शरीर नष्ट करू शकणार नाही. या वरदानाच्या बळावर तो ऋषीमुनींचे आश्रम उद्ध्वस्त करू लागला, यज्ञकुंडे नष्ट करू लागला आणि मानवांना जिवंत गिळू लागला.

'अनल' या शब्दाचा संस्कृतमध्ये अर्थ होतो – 'अग्नी'. अनलासुर म्हणजे साक्षात धगधगणारी आग! त्याच्या नेत्रांतून आणि मुखातून सतत विनाशकारी अग्नीच्या ज्वाला निघत असत. संपूर्ण सृष्टी त्याच्या तापाने होरपळून निघाली. इंद्रादी देव, यम, वरुण, कुबेर यांपैकी कोणीही त्याचा पराभव करू शकले नाही. अखेर सर्व देवांनी आणि महर्षींनी कैलासावर जाऊन भगवान शंकरांना साकडे घातले. शंकरांनी त्यांना सांगितले, या अग्निरूपी दैत्याचा विनाश केवळ विवेकदाता, विघ्नहर्ता गजाननच करू शकतो.

सर्व देवांच्या विनंतीवरून बाल गणेशाने अनलासुराशी युद्ध आरंभले. जेव्हा गणरायांच्या लक्षात आले की बाह्य शस्त्राने याला मारता येत नाही, तेव्हा गणेशाने आपले रूप अवाढव्य, विराट केले आणि त्या धगधगत्या अनलासुराला एका झटक्यात जिवंत गिळंकृत केले!

अनलासुराचा अंत तर झाला, विश्वाला त्याच्या त्रासातून मुक्ती मिळाली; परंतु अनलासुर हा साक्षात जळणारा अग्नी असल्याने गणपती बाप्पाच्या पोटात प्रचंड जळजळ (दाह) सुरू झाली. गणरायांचे उदर इतके तापले की त्यांचे अंग लालबुंद झाले, मस्तकातून ज्वाला निघू लागल्या, घशाला कोरड पडली आणि ते असह्य वेदनेने व्याकुळ झाले.

गणपतीचा हा दाह शांत करण्यासाठी देवांनी अनेक प्रयत्न केले: भगवान विष्णूंनी आपले शीतल कमळ गणेशाला दिले. भगवान शंकरांनी आपल्या गळ्यातील शीतल सर्प गणेशाच्या पोटाभोवती बांधला (त्यामुळे गणपतीला 'उदरबंध' किंवा सर्पबंध असे नाव मिळाले). देवराज इंद्राने शीतल पाऊस पाडला, चंद्रदेवाने अमृतमय शीतल किरणांची वृष्टी केली, आणि वरुणदेवाने शीतल जलाचा अभिषेक केला.

परंतु गणपतीचा पोटातला भडका शांत झाला नाही; उलट ती उष्णता वाढतच गेली. कारण बाह्य थंडावा कधीही आतल्या जठराग्नीचा दाह शांत करू शकत नाही.

तेव्हा तिथे महर्षि कश्यप आले. महर्षि कश्यप हे केवळ ऋषी नव्हते, तर ते सृष्टीतील वनस्पती आणि औषधी विज्ञानाचे महाप्रकांड ज्ञाते होते. त्यांनी निसर्गाची नाडी ओळखली होती. कश्यप ऋषींनी जवळच उगवलेल्या साध्या हिरव्या दुर्वांच्या २१ गाठी (जुड्या) बांधल्या आणि त्या गणपती बाप्पाला खाण्यास दिल्या.

ज्या क्षणी त्या अमृतमय, शीतल दुर्वा गणेशाच्या जठरात गेल्या, त्याच क्षणी गणरायांच्या पोटातील सर्व दाह, सर्व जळजळ क्षणात शांत झाली! गणपतीचे शरीर पुन्हा प्रसन्न झाले, त्यांची वेदना नाहीशी झाली. तेव्हापासून गणेशाच्या पूजेत दुर्वेला अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले.

गणेशाने अनलासुराला मारले नाही, तर 'पचवले': याचा अर्थ अत्यंत सुंदर आहे. दुर्गुणांशी किंवा संकटांशी सतत बाहेर भांडत बसण्यापेक्षा, त्यांना आपल्या विवेकाने (बुद्धीने) आत सामावून घ्यायचे असते आणि पचवून शांत करायचे असते. नकारात्मकता पचवण्याची ताकद केवळ गणेशासारख्या स्थिर बुद्धीमध्येच असते!

परंतु जेव्हा बुद्धी जगाचा एवढा मोठा तणाव पचवते, तेव्हा त्या बुद्धीला, त्या मनाला शांत करण्यासाठी कशाची गरज असते? तर 'दुर्वा' म्हणजेच शांत, साधे आणि नैसर्गिक विचार!

आपल्या पूर्वजांनी दुर्वेची निवड विनाकारण केली नाही. दुर्वा ही आयुर्वेदातील सर्वात शक्तिशाली औषधी वनस्पतींपैकी एक आहे. भावप्रकाश आणि चरक संहितेनुसार दुर्वेचे गुणधर्म सांगितलेले आहेत: दुर्वा ही प्रकृतीने अत्यंत थंड असते. ती शरीरातील अतिरिक्त उष्णता त्वरित शोषून घेते. आधुनिक विज्ञान सांगते की जेव्हा शरीरात सिड वाढते, तेव्हा कॅन्सरपासून अल्सरपर्यंत सर्व आजार होतात. दुर्वा ही जगातल्या सर्वात उत्कृष्ट अल्कलाईन घटकांपैकी एक आहे. ती शरीराचा कि्स्तर संतुलित करते.

दुर्वेमध्ये अत्यंत शुद्ध स्वरूपातील क्लोरोफिल असते, ज्याला 'हिरवे रक्त' मानले जाते. ते मानवी शरीरातील रक्ताभिसरण सुधारते, हिमोग्लोबिन वाढवते आणि मज्जासंस्थेला शांत करते.

महर्षि कश्यपांनी गणेशाला दुर्वा दिल्या, यामागे हेच शुद्ध रसायनशास्त्र होते. जेव्हा पोटात जळजळ होते, तेव्हा दुर्वेचा रस हा जालीम उतारा ठरतो. आजही आयुर्वेदात पित्तप्रकोप, त्वचारोग, नाकातून रक्त येणे (उष्णतेमुळे), आणि मानसिक अस्वस्थतेवर दुर्वेचा रस पिण्याचा सल्ला दिला जातो. आपल्या ऋषींनी या दैवी औषधाचे महत्त्व समाजाला कळावे, म्हणून त्याला पूजेचे आणि धर्माचे पवित्र स्वरूप दिले. आपण गणपतीला २१ दुर्वांची जुडी अर्पण करतो, त्यामागे मानवी देहरचनेचे परिपूर्ण आध्यात्मिक गणित दडलेले आहे. आपल्या अस्तित्वाची उभारणी एकूण २१ तत्त्वांवर झालेली आहे; ज्यामध्ये कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक ही ५ ज्ञानेंद्रिये; हात, पाय, वाणी, गुद आणि जननेंद्रिय ही ५ कर्मेंद्रिये; प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे ५ मुख्य प्राण; तसेच पृथ्वी, आप (पाणी), तेज (अग्नी), वायु आणि आकाश ही ५ महाभूते समाविष्ट आहेत.

या वीस बाबींवर आणि संपूर्ण इंद्रियांवर नियंत्रण ठेवणारे अंतःकरण म्हणजेच १ मन किंवा चित्त होय. अशा प्रकारे (५ ज्ञानेंद्रिये + ५ कर्मेंद्रिये + ५ प्राण + ५ महाभूते + १ मन) मिळून मानवी देहाची संपूर्ण रचना या २१ तत्त्वांनी साकार होते. संसारात वावरताना जेव्हा आपल्या या घटकांमध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांचा दाह निर्माण होतो, तेव्हा ती सर्व २१ तत्त्वे बुद्धीदाता गणरायाच्या चरणी समर्पित करून मन व देह शांत करण्याचा हा शुद्ध आध्यात्मिक संकेत आहे.

आपले शरीर या २१ घटकांपासून बनलेले आहे. जेव्हा आपण संसारात जगत असतो, तेव्हा आपल्या या २१ घटकांमध्ये वासना, अहंकार, क्रोध आणि मोहाची उष्णता निर्माण होते – म्हणजेच आपल्या आतही अनलासुर जागा होतो.

**गणपतीला २१ दुर्वा अर्पण करणे म्हणजे :**

हे गजानना, मी माझी पाचही ज्ञानेंद्रिये, पाचही कर्मेंद्रिये, पाचही प्राण, पंचमहाभूते आणि माझे चंचल मन – ही माझी २१ तत्त्वे तुमच्या चरणी समर्पित करतो. माझ्या देहातील आणि मनातील क्रोधाचा, विकारांचा दाह शांत करा आणि माझ्या अंतःकरणाला दुर्वेसारखे शीतल, ताजे आणि टवटवीत ठेवा!

हा या पूजेचा खरा अर्थ आहे. पुराणात दुर्वेशी संबंधित आणखी एक गोड आणि हळवी कथा आढळते.

कैलासावर माता पार्वतीची 'दुर्वा' नावाची एक अत्यंत निष्पाप आणि साधी दासी होती. ती अंतःकरणापासून भगवान गणेशावर निस्सीम आणि निस्वार्थ प्रेम करत होती. तिची इच्छा होती की तिने गणेशाच्या सान्निध्यात सदैव राहावे. परंतु ती एक साधी दासी असल्याने गणेशाला आपल्या मनातील भाव सांगण्याचे धाडस ती करू शकत नव्हती. तिचे प्रेम कोणतेही ऐहिक किंवा वासनामय नव्हते; ते पूर्णतः भक्तीमय आणि समर्पणाचे होते. माता पार्वती ही अंतर्यामी आहे. तिने त्या दासीच्या मनातील शुद्ध आणि निष्पाप भावना ओळखल्या. पार्वतीने तिला प्रेमाने जवळ घेतले आणि सांगितले:

मुली, तुझ्या प्रेमात कोणताही स्वार्थ किंवा अहंकार नाही. जे निष्काम आणि निरहंकारी असते, तेच ईश्वराला सर्वात जवळ असते. तू या पृथ्वीवर एका अत्यंत साध्या, हिरव्यागार तृणाच्या (गवताच्या) रूपात अवतीर्ण होशील. जेथे फुले नसतील, तेथेही तू सहजतेने उगवशील. आणि साक्षात भगवान गणेश तुला स्वतःच्या मस्तकावर धारण करतील! तुझ्याशिवाय गणेशाची कोणतीही पूजा पूर्ण मानली जाणार नाही. शास्त्रामध्ये गणपतीला दुर्वा वाहण्याचे काही विशिष्ट नियम सांगितले आहेत, जे आपण समजून घेतले पाहिजेत: दुर्वा नेहमी कोवळ्या आणि तीन किंवा पाच पातींच्या असाव्यात: दुर्वेच्या टोकाला तीन पाती असाव्यात. या तीन पाती म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश (किंवा सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे संतुलन) मानल्या जातात.

**स्वच्छ ठिकाणी उगवलेली दुर्वा :** घाण पाण्यावर, रस्त्याच्या अत्यंत प्रदूषित कडेला किंवा अपवित्र जागेवर उगवलेली दुर्वा पूजेसाठी वापरू नये. शेतात किंवा बागेत स्वच्छ पाण्यावर वाढलेली दुर्वाच तोडावी.

**पाण्याने स्वच्छ धुवून अर्पण करणे :** दुर्वा नेहमी स्वच्छ पाण्याने धुवून, त्यावर पाण्याचे थेंब ताजे असतानाच वाहावी.

**दुर्वा कुठे वाहावी?:** गणपतीच्या पायावर फुले वाहावीत, परंतु दुर्वा नेहमी गणरायाच्या मस्तकावर अर्पण करावी. कारण महर्षि कश्यपांनी दुर्वेचा लेप आणि जुडी गणेशाच्या मस्तकावर ठेवून त्यांचा आंतरिक दाह शांत केला होता. मस्तकावर दुर्वा वाहिल्याने आपल्या स्वतःच्या मेंदूतील विचारांची उष्णताही शांत होते.

दुर्वे मागील वैज्ञानिक आणि आध्यात्मिक तत्त्व समजण्यास मदत झाली का?

।। गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया ।।



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६



मुकुंदनगर येथील गौरव नगर मित्र मंडळ येथे गणेशोत्सवानिमित्त गणरायाची आरती करताना उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे.

# मुकुंदनगर येथे पोलिस अधिकाऱ्यांच्या हस्ते गणरायाची आरती

नगर – मुकुंदनगर येथील गौरवनगर मित्र मंडळ येथे गणेशोत्सवानिमित्त भक्तिमय वातावरणात गणरायाची आरती करण्यात आली.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात मॅडम तसेच इतर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून श्री गणरायाची विधिवत आरती केली.

यावेळी मंडळाच्या वतीने पोलिस अधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. गणेशोत्सव काळात नागरिकांनी शांतता, शिस्त व सामाजिक सलोखा राखत उत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमुळे मंडळातील गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आभार मानले. यावेळी गौरवनगर मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील गणेशभक्त उपस्थित होते.

# 'स्कायब्रिज'चा राजा मोरयाचे उत्साहात आगमन

## गणेशोत्सवात विविध धार्मिक, सांस्कृतिक, मनोरंजन कार्यक्रमांची रेलचेल




नगर – बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज येथे राजा मोरया गणपतीची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. उत्साही वातावरणात रहिवाशांनी लाडक्या गणरायाचे स्वागत केले. गणेशोत्सव काळात बारा दिवस याठिकाणी विविध रंग, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

गणेशोत्सव म्हणजे श्रद्धा, भक्ती, संस्कार आणि आनंद यांचा सुंदर संगम. गृहप्रकल्पातील गणेशोत्सवाचे यंदा तिसरे वर्ष आहे. बाप्पाची भक्ती, सर्व कुटुंबीयांचा सहभाग, मुलांचा उत्साह, तरुणाईची ऊर्जा, महिलांचा सहभाग आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद या सर्वांचा सुरेख मिलाफ या उत्सवात अनुभवायला मिळत आहे. एकत्र राहणाऱ्या कुटुंबांना आणखी जवळ आणणारा, नाती घट्ट करणारा आणि प्रत्येक दिवस आठवणीत ठेवणारा उत्सव ठरत आहे. यंदाच्या येथील गणेशोत्सवात नवरात्रीप्रमाणे दर दिवशी वेगवेगळ्या रंगांची थीम आहे. १५ सप्टेंबर रोजी पिवळ्या रंगाची ड्रेसकोड थीम असेल.

१६ सप्टेंबर रोजी गुलाबी रंगाची थीम आणि रात्री ८.३० वाजता जैन परंपरेतील सामूहिक क्षमापना व सामूहिक भावा कार्यक्रम होईल. १७ सप्टेंबर रोजी साऊथ इंडियन थीम व रात्री ८.३० वाजता म्युझिकल चेअर, १८ सप्टेंबर रोजी निळ्या रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता ग्रुप गेम्स, १९ सप्टेंबर रोजी इंडो वेस्टर्न ड्रेस थीम व सायंकाळी ६.३० पासून फन फेअर, २० सप्टेंबर रोजी गुजराती घागरा/साडी आणि कुर्ता–पायजमा ड्रेस थीम, सत्यनारायण पूजा, सायंकाळी सामूहिक भोजन आणि किडस ग्रुप तंबोला, २१ सप्टेंबर रोजी ऑरेंज रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता अंताक्षरी, २२ सप्टेंबर रोजी पर्पल रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता पेअर टॅलेंट हंट, २३ सप्टेंबर रोजी ग्रीन रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता ट्रेझर हंट, २४ सप्टेंबर रोजी फ्लोरल थीम, २५ सप्टेंबर रोजी निळ्या रंगाची थीम व दुपारी ४ नंतर गणेश विसर्जन कार्यक्रम होईल. उत्सव काळात दररोज सकाळी आणि सायंकाळी गणपतीची आरती होईल.

झटपट रेसिपी

# लज्जत कॉर्न मेथी पुलावची



रात्रीच्या जेवणासाठी झटपट काहीतरी बनवायचं असेल आणि फार कष्टही घ्यायचे नसतील तर कॉर्न मेथी पुलाव हा बेस्ट ऑप्शन आहे. नेहमीच्या व्हेज पुलावला पर्याय म्हणून हा पुलाव करता येईल.

**सामग्री:** दीड कप बासमती तांदूळ, थोडी मेथीची पानं, अर्धा चमचा जीरं, दोन वेलच्या, तीन लवंग, दालचिनीचे दोन तुकडे, एक तमालपत्र, चार हिरव्या मिरच्या, दोन कांदे, दोन चमचे आलं-लसूण पेस्ट, १०० ग्रॅम उकडलेले स्वीटकॉर्न, एक चमचा लबाचा रस, चार चमचे तूप, मीठ

**कृती:** सर्वात आधी तांदूळ धुवून साधारण पंधरा मिनिटं बाजूला ठेवा. मेथीची पानं धुवून घ्या. आता कढईत तूप घाला. वितळल्यावर जीरं, लवंग, दालचिनी, तमालपत्र घाला. परतून घ्या. त्यात चिरलेला कांदा आणि दोन मिरच्या घालून परता. कांद्याचा रंग सोनेरी झाल्यावर त्यात आलं-लसूण पेस्ट घाला. यानंतर मेथीची पानं आणि मक्याचे दाणे घालून परता. आता तांदूळ घालून परता. यानंतर त्यात प्रमाणात पाणी घाला, चवीनुसार मीठ घालून तांदूळ शिजू द्या. कढईवर ताटली ठेवा. पाच ते दहा मिनिटांनी पुलाव झालेला असेल.




## शेर की जुबानी

ना जाने इतनी मोहब्बत
कहां से आई है उसके लिए।
की मेरा दिल भी
उसकी खातिर
मुझसे रूठ जाता है।

है कुबुल शिकायते
हमें आपकी सारी,
लेकिन कहना
तो थोडा
मुस्कुराकर कहना

बहुत खुबसूरत होते
हैं ऐसे रिश्ते
जिन पर कोई
हक भी ना हो
और शक भी ना हो।

अचिव्हर

# नोकरी सोडून डेअरी व्यवसाय

आयटी क्षेत्रात चांगल्या पगाराची नोकरी, कॉर्पोरेट जीवनातील सुविधा आणि सुरक्षित उत्पन्न असतानाही स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे धाडस फारच कमी जण करतात; मात्र हैदराबादमधील एका ४२ वर्षीय 'टेक एक्सपर्ट'ने नोकरीच्या सुरक्षित चौकटीबाहेर पडत स्वतःचा डेअरी व्यवसाय सुरू केला. विशेष म्हणजे, आज त्यांच्या या व्यवसायाची महिन्याला उलाढाल सुमारे ३.५ लाखांपर्यंत पोहोचली असून, त्यातून जवळपास १.५ लाखांचा नफा मिळत आहे.

या व्यक्तीची प्रेरणादायी कहाणी सॉफ्टवेअर इंजिनीअर विकास ऑलवेज यांनी 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म 'एक्स'वर शेअर केली. त्यांच्या पोस्टनुसार, संबंधित ४२ वर्षीय व्यक्तीने उस्मानिया विद्यापीठातून बीटेकचे शिक्षण घेतले असून, ते 'आयटी' क्षेत्रात कार्यरत होते. त्यांना वर्षाला सुमारे १८ लाखांचे पॅकेज मिळत होते. कॉर्पोरेट क्षेत्रात चांगली नोकरी आणि आकर्षक पगार असूनही गेल्या काही काळात 'आयटी' क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीमुळे त्यांना नोकरीच्या भवितव्याची चिंता वाटू लागली. अमेरिकेतील राजकीय बदल आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनानंतर 'आयटी' बाजारावर होणाऱ्या संभाव्य परिणामांमुळे अनेक कंपन्यांमध्ये प्रोजेक्ट्स आणि कामाच्या संधींबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती.

त्यांच्या कंपनीतही प्रोजेक्ट्स कमी होऊ लागल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिणामी, भविष्यात नोकरी गमावण्याची शक्यता आणि त्यातून निर्माण होणारी आर्थिक असुरक्षितता याचा ते सतत विचार करू लागले; मात्र नोकरी जाण्याची वाट पाहत सतत तणावात राहण्याऐवजी त्यांनी स्वतःच वेगळा मार्ग निवडला. या ४२ वर्षीय 'टेक एक्सपर्ट'ने अखेर 'आयटी' क्षेत्रातील नोकरीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.




त्यांनी नोकरीतून मिळवलेली बचत वापरून ऑर्गेनिक डेअरी व्यवसाय सुरू केला. या निर्णयामागे एक महत्त्वाची गोष्ट होती. त्यांच्यावर कोणतेही कर्ज नव्हते. त्यामुळे व्यवसाय सुरू करताना कर्जाच्या हप्त्यांचा किंवा मोठ्या आर्थिक दायित्वांचा दबाव त्यांच्या डोक्यावर नव्हता. स्वतःची बचत असल्याने व्यवसायात आवश्यक तेवढा धोका घेणे त्यांना शक्य झाले. त्यांनी सुरुवातीला शुद्ध दूध, दही, पनीर आणि देसी तूप यांसारख्या ऑर्गेनिक डेअरी उत्पादनांची विक्री सुरू केली. हळूहळू ग्राहकांचा प्रतिसाद वाढत गेला आणि व्यवसायाने चांगली गती पकडली.

अ‍ॅप वर्ल्ड




## 'गुगल मॅप्स'चे 'डेली प्लॅनिंग'!

'गुगल मॅप्स'आता फक्त रस्ता शोधण्यापुरते किंवा नेव्हिगेशनपुरते मर्यादित राहिलेले नाही. 'गुगल'ने आपल्या मॅप्स प्लॅटफॉर्मसाठी एक नवे आणि 'हाय-टेक अपडेट रोलआउट' करण्यास सुरुवात केली आहे. आता हे ॲप तुमच्या संपूर्ण दिवसाचे प्लॅनिंग करण्यासोबतच अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यासही मदत करणार आहे.

'गुगल'ने काही महिन्यांपूर्वी लॉंच केलेल्या 'आस्क मॅप्स' या फीचरचा विस्तार केला आहे. यात आता नवीन 'एजेंटिक टूल्स' ॲड करण्यात आले आहेत.

*जेवण ऑर्डर करणे : तुम्ही ड्रायव्हिंग करत असताना किंवा प्रवासात असताना मॅप्सला फक्त काय खायचे आहे ते सांगा. एआय एजेंट स्वतः उत्तम रेस्टॉरंट निवडून कार्टमध्ये मेनू ॲड करेल (पेमेंटचा पर्याय तुमच्याकडेच राहील).

*हॉटेल सर्च आणि तुलना : हॉटेल्स शोधण्यासाठी वेगवेगळ्या वेबसाइटवर जाण्याची गरज उरणार नाही. मॅप्स विविध हॉटेल्सच्या सुविधा आणि किमतींची तुलना करून सर्वोत्तम पर्याय समोर ठेवेल.

*लोकल इव्हेंट्स आणि तिकीट बुक : तुमच्या जवळील कॉमेडी शो, कॉन्सर्ट आणि इतर लाईव्ह इव्हेंट्सची माहिती मिळवून मॅप्स थेट तिकीट खरेदीची लिंकही उपलब्ध करून देईल.

'पर्सनल इंटेलिजन्स' फीचरची कमाल

नवीन अपडेटमध्ये 'पर्सनल इंटेलिजन्स'हे उपयोगी फीचर जोडण्यात आले आहे. हे फीचर युझरच्या जीमेल आणि गुगल कॅलेंडर मधील माहितीचा वापर करून कस्टम रिकमेंडेशन्स देईल.

*आपोआप ट्रिप प्लॅनिंग: जीमेल किंवा कॅलेंडरवर एखाद्या ट्रिपच्या तारखा किंवा कॉन्फरन्सचे इन्व्हिटेशन आले असेल, तर मॅप्स त्या आधारे त्या ठिकाणाजवळील हॉटेल्स आणि इव्हेंट्सचे डिटेल्स आपोआप स्क्रीनवर दाखवेल.

*कमी वेळेत योग्य नियोजन: यासाठी युझर्सला कोणताही जास्तीचा डेटा किंवा डिटेल्स मॅन्युअली भरण्याची गरज नाही.

सर्वात आधी कुठे उपलब्ध होणार?

'गुगल' आता मॅप्सला युजरच्या दैनंदिन आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करत आहे. हे सर्व नवीन 'एआय फीचर्स' आणि अपग्रेड्स सर्वात आधी अमेरिकेत रोलआउट केले जात आहेत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने ते भारत आणि इतर देशांमधील युझर्ससाठी उपलब्ध केले जातील.

उच्च शिक्षण

# एमबीए की एम.टेक?

अभियांत्रिकीची पदवी पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध अनेक पर्यायांपैकी नोकरी करणे हा थेट आणि स्वाभाविक पर्याय आहे; परंतु काही विद्यार्थी उच्चशिक्षण घ्यावे असा विचार करतात. तिथेही अनेक पर्याय आहेत. त्यापैकी महत्त्वाचे शिक्षण पर्याय आहेत एमटेक किंवा एमबीए. यापैकी काय करावे? हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. दोन्ही अभ्यासक्रम उत्कृष्ट असून त्यातून उत्तम करिअर घडू शकते; मात्र सुयोग्य निर्णय घेण्यासाठी स्वतःची शैक्षणिक वाटचाल, आवड, क्षमता व्यक्तिमत्त्व, स्वभाव, सवयी आणि भविष्यातील करिअरचे ध्येय यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे.



अभियांत्रिकीच्या चार वर्षांमधील गुण, तांत्रिक विषयांवरील समज, प्रोजेक्ट्स, इंटर्नशिप आणि प्रत्यक्ष कामातील कामगिरी यावरून विद्यार्थ्याची शैक्षणिक दिशा स्पष्ट होते. आपला कल स्पष्टपणे लक्षात येतो. तांत्रिक विषयांमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एम.टेक हा नैसर्गिक पुढचा टप्पा ठरू शकतो, तर गॅदरिंग, इव्हेंट्स, कार्यक्रम, स्पर्धा आदी ठिकाणी व्यवस्थापन, संघटन आणि अचूक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत यशस्वी झालेले 'एमबीए'चा विचार करू शकतात. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व करिअर निवडीत महत्त्वाची भूमिका बजावते. शांत, संयमी, विश्लेषणात्मक आणि संशोधनाभिमुख व्यक्तिमत्त्व असलेले विद्यार्थी एम.टेकच्या माध्यमातून अधिक यशस्वी होऊ शकतात. याऐवजी प्रभावी संवाद, नेतृत्व, लोकांशी संबंध निर्माण करणे, टीमला प्रेरित करणे आणि जबाबदाऱ्या स्वीकारणे ही वैशिष्ट्ये असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'एमबीए' अधिक अनुकूल ठरतो.

जिज्ञासू, तांत्रिक समस्यांची उत्तरे शोधण्याची वृत्ती आणि नवीन तंत्रज्ञान शिकण्याची तयारी असलेल्यांनी एम.टेकचा विचार करावा. दुसरीकडे, बदल स्वीकारणारा, निर्णयक्षम, व्यावसायिक दृष्टिकोन असलेला आणि संधी शोधणारा स्वभाव 'एमबीए'मध्ये अधिक उपयोगी पडतो. सतत वाचन, तांत्रिक कौशल्ये विकसित करणे, प्रयोग करणे आणि नवीन ज्ञान आत्मसात करण्याच्या सवयी एम.टेकमध्ये फायदेशीर ठरतात. वर्तमान घडामोडींचा अभ्यास, नेटवर्किंग, सादरीकरण, वेळेचे नियोजन आणि टीममध्ये काम करण्याच्या सवयी 'एमबीए'साठी उपयुक्त असतात.

करिअरमध्ये दीर्घकालीन यशासाठी आवड आणि क्षमता यांचा मेळ आवश्यक असतो. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स', 'रोबोटिक्स', 'डेटा सायन्स', 'व्हीएलएसआय', 'कोअर इंजिनीअरिंग' अर्थातच त्यांच्या शाखांमधील तांत्रिकी विषयांमध्ये रस आणि विश्लेषणात्मक क्षमता असल्यास एम.टेक योग्य ठरतो. मार्केटिंग, फायनान्स, मानव संसाधन, ऑपरेशन्स, उद्योजकता किंवा बिझनेस मॅनेजमेंटमध्ये आवड, संवादकौशल्य आणि नेतृत्वगुण असल्यास 'एमबीए' अधिक योग्य पर्याय आहे.

एम.टेकनंतर संशोधन, पीएच.डी., अध्यापन, डीआरडीओ, इस्रो, बार्क, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच एआय, रोबोटिक्स, सायबर सिक्युरिटी सेमीकंडक्टर, एनर्जी सेक्टर यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये करिअरच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध आहेत. 'एमबीए'नंतर मार्केटिंग, फायनान्स, मानव संसाधन, ऑपरेशन्स, सप्लाय चेन, बिझनेस डेव्हलपमेंट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, बँकिंग, कन्सल्टिंग, कॉर्पोरेट लीडरशिप तसेच स्वतःचा उद्योग किंवा स्टार्टअप सुरू करण्याच्या अनेक संधी उपलब्ध होतात. तांत्रिकी क्षेत्राशिवाय विविध आस्थापनांच्या अन्य आघाड्यांवर काम करण्याची इच्छा असल्यास 'एमबीए' उजवे ठरू शकते. एम.टेक आणि 'एमबीए' या दोन्ही पदव्या महत्त्वाच्या आहेत. एम.टेकसाठी 'गेट' तर 'एमबीए'साठी 'कॅट' किंवा 'सीईटी' ही परीक्षा देणे अपेक्षित असते. आपल्याला सुयोग्य अशी अचूक निवड केल्यास केवळ चांगली नोकरीच नव्हे, तर समाधानकारक, प्रगतिशील आणि यशस्वी करिअर घडविणे शक्य होते.

# फॅशनचा रोमॅंटिक ट्रेंड

चित्रपटांमधील फॅशनचा लोकांच्या आवडी-निवडी आणि स्टाइलवर नेहमीच मोठा प्रभाव राहिला आहे. मोठ्या पडद्यावर कलाकारांचे हटके फॅशन ट्रेंड लवकरच सर्वसामान्यांच्या वॉर्डरोबचा भाग बनतात. सध्या पिवळा आणि काळा रंगांचा संगम हा रोमॅंटिक फॅशनचा नवा स्टाइल स्टेटमेंट म्हणून लोकप्रिय होत आहे. 'डेट नाइट'पासून पार्टीपर्यंत कपल्स या रंगसंगतीचा वापर करून आपली स्टाइल आणि नात्यातील केमिस्ट्री खास पद्धतीने व्यक्त करत आहेत.



फॅशन पॅशन

आज पिवळ्या ड्रेससोबत काळ्या सूटचे कॉम्बिनेशन हे सिनेमातील रोमान्सचे एक लोकप्रिय प्रतीक बनले आहे. पिवळा रंग आनंद, उत्साह आणि नव्या आशेचे प्रतीक मानला जातो. या रंगामुळे आनंद आणि ऊर्जेची भावना वाढण्यास मदत होते. दुसरीकडे, काळा रंग साधेपणा, आत्मविश्वास आणि स्टाइलचे प्रतीक आहे. प्रेमात असलेल्या व्यक्तींनी हे दोन्ही रंग एकत्र परिधान केल्यास त्यांचा लूक अधिक आकर्षक दिसतो. त्यामुळे फॅशन तज्ज्ञही या रंगसंगतीला विशेष महत्त्व देतात. त्यांच्या मते, हा केवळ ड्रेस कोड नाही, तर एका प्रेमकथेची सुंदर अभिव्यक्ती आहे.

पिवळा रंग आपल्या चमकदारपणा, ऊर्जा आणि बेफिकीर आकर्षणामुळे प्रत्येकाचे लक्ष वेधून घेतो, तर काळा रंग खोली, आत्मविश्वास आणि गूढ ठामपणाचे प्रतीक मानला जातो. या दोन्ही रंगांमधील विरोधाभास त्यांना एकमेकांचे सुंदर पूरक बनवतो. चित्रपटांपासून सुरू झालेली ही रंगसंगती आता 'जेन-झी'च्या आवडत्या 'रोमॅंटिक स्टाइल'चा भाग बनली आहे. आकर्षक बोर्डस, कपल फोटोशूट्स आणि व्हायरल रील्समध्ये या रंगसंगतीची लोकप्रियता सातत्याने वाढत आहे. विशेष म्हणजे, अतिरिक्त स्टायलिंगची गरज नसतानाही हे कॉम्बिनेशन प्रत्येक फ्रेमला सिनेमॅटिक आणि आकर्षक बनवते.

लग्नाचा वाढदिवस असो; रोमॅंटिक डेट, हनिमून, एखादा प्रवास किंवा डिनर पार्टीही ट्विनिंग स्टाइल तुमच्या नात्यातील उत्साह आणि रोमान्स वाढवून खास क्षणांना अधिक संस्मरणीय बनवू शकते. महिलांसाठी 'एथनिक लूक'मध्ये पिवळी साडी किंवा अनारकली सूट हा चांगला पर्याय ठरू शकतो. 'वेस्टर्न लूक'मध्ये पिवळ्या ड्रेससोबत क्रीम रंगाच्या हिल्स स्टायलिश दिसतील. मेकअप शक्यतो सौम्य ठेवा. 'न्यूड लिप्स' आणि हलका 'गोल्डन आयशॅडो लूक'ला उठाव देऊ शकतो.

टेक्नो टॉक



## विमानापेक्षाही 'हायस्पीड'!

'हाय-स्पीड ट्रेन' तंत्रज्ञानामध्ये चीनने पुन्हा एकदा जगाला थक्क केले आहे. चीनच्या प्रायोगिक 'मॅग्लेव' बुलेट ट्रेनने अवघ्या ५.३ सेकंदात तब्बल ८०० किलोमीटर प्रतितास इतका अफाट वेग गाठून नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये या ट्रेनने वेगवान प्रवेग गाठण्याचा स्वतःचाच विक्रम मोडण्याची ही तिसरी वेळ आहे.

हुबेई प्रांतातील 'डोंघू लॅबोरेटरी' येथील एक किलोमीटर लांबीच्या विशेष टेस्ट-ट्रॅकवर ही यशस्वी चाचणी पार पडली. १.१ टन वजनाच्या या बुलेट ट्रेनने ८०० किलोमीटरचा ताशी वेग गाठल्यानंतर अवघ्या दोनशे मीटर अंतरात अत्यंत सुरक्षितपणे पूर्ण ब्रेक लावून स्वतःला थांबवूनही दाखवले. चीन आणि जपानमध्ये सध्या धावणाऱ्या कमर्शियल मॅग्लेव ट्रेन साधारण ३२० ते ३५० किमी प्रतितास वेगाने धावतात; पण या नव्या प्रायोगिक तंत्रज्ञानाने वेगाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत.

'मॅग्लेव' तंत्रज्ञान नक्की कसे काम करते?

*घर्षणमुक्त प्रवास: या तंत्रज्ञानामध्ये ट्रेन रुळांना थेट स्पर्श करत नाही. चुंबकीय क्षेत्राचा वापर करून ट्रेन हवेत तरंगती ठेवली जाते.

*इलेक्ट्रोमॅग्नेटिक फोर्स: रुळांमधील चुंबकीय लहरी ट्रेनला वेगाने पुढे ढकलतात. घर्षण पूर्णपणे नाहीसे झाल्यामुळे ट्रेनला अफाट वेग मिळतो.

*अतिसूक्ष्म अचूकता: या ट्रॅकची रचना इतकी अचूक आहे की यात ०.५ मिलिमीटरपेक्षा जास्त फरक पडू दिला जात नाही.

स्पेसक्राफ्ट आणि विमानांच्या लॉंचिंगसाठी होणार वापर

चीनचे संशोधक सध्या कमी हवेचा दाब किंवा 'व्हॅक्युम ट्यूब्ज'मधून ट्रेन धावू शकेल अशा पुढील पिढीच्या 'मॅग्लेव सिस्टीम'वर काम करत आहेत. ही ट्रेन अजून तरी प्रवाशांच्या वाहतुकीसाठी खुली केलेली नाही; पण या चाचणीत वापरलेले इलेक्ट्रोमॅग्नेटिक आणि हाय-पॉवर एनर्जी तंत्रज्ञान भविष्यात अंतराळवीर/स्पेसक्राफ्ट आणि लष्करी विमाने लॉंच करण्यासाठी वापरले जाऊ शकते, असा विश्वास चीनी शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे.

# काम करून शिक्षण





कमवा-शिका

उच्च शिक्षण अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे आणि दूरस्थ शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने 'झारखंड स्टेट ओपन युनिव्हर्सिटी' (जेएसओयू)च्या बोकारो क्षेत्रीय केंद्रात जुलै २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. सेक्टर-३बी येथील माजी 'इग्नू' कॅम्पसमध्ये हे केंद्र असून, विद्यार्थ्यांना सुलभ, दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्यावर विद्यापीठाचा भर आहे. विद्यापीठात कला आणि वाणिज्य शाखेतील अनेक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिला जात आहे. पदवी (यूजी) स्तरावर हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि बी.कॉम या अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जात आहे. तसेच विविध पदव्युत्तर (पीजी) अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. याशिवाय रोजगाराच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे १९ प्रकारचे 'डिप्लोमा' आणि 'पीजी डिप्लोमा' अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले आहेत. बोकारो क्षेत्रीय केंद्राचे प्रभारी हरेंद्र नाथ चौबे यांनी सांगितले, की नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणांमुळे नियमित महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ओपन युनिव्हर्सिटीची लवचिक शिक्षण पद्धती मोठी संधी ठरत आहे. क्षेत्रीय प्रभारी संजीव कुमार यांनी विद्यार्थी आणि पालकांना शेवटच्या तारखेची वाट न पाहता वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. प्रवेश प्रक्रिया, पात्रता, शुल्क आणि अभ्यासक्रमांबाबत अधिक माहिती हवी असल्यास इच्छुक विद्यार्थी 'झारखंड स्टेट ओपन युनिव्हर्सिटी'च्या बोकारो क्षेत्रीय केंद्राला, सेक्टर-३बी येथील माजी 'इग्नू' कॅम्पसमध्ये भेट देऊन माहिती मिळवू शकतात.

# तंत्र पुश अप्सचं

पुश अप्स केल्यामुळे संपूर्ण शरीराला व्यायाम मिळतो. शरीराच्या वरच्या भागाच्या स्नायूंच्या बळकटीसाठी पुश अप्स खूप उपयुक्त ठरतात. पुश अप्ससाठी कोणत्याही उपकरणाची गरज नसते. त्यामुळे हा व्यायाम अगदी कुठेही करता येतो. तंदुरुस्तीसाठी कोणत्याही एका व्यायामाची निवड करायची असेल तर पुश अप्स हा सर्वोत्तम व्यायामप्रकार ठरतो. मात्र बरेच जण योग्य पद्धतीने पुश अप्स करतच नाहीत. काही जण कमी तर काही जण आवश्यकतेपेक्षा जास्त पुश अप्स करतात. उत्तम आरोग्यासाठी नेमक्या किती पुश अप्स करायला हव्यात याबाबतचं मार्गदर्शन...



फिटनेस फंडा

पुश अप हा तुलनेने बराच कठीण व्यायामप्रकार आहे. नियमित सरावानेच तो जमू शकतो. सुरूवातीला पुश अप्स करताना त्रास होऊ शकतो. शिवाय स्थूल लोकांना पुश अप्स बऱ्याच अवघडही पडतात. पण काळजी करू नका. सुरूवातीला दोन पुश अप्स जमल्या तरी तिथून सुरूवात करा. हळूहळू संख्या वाढवा. एका दिवसात किती पुश अप्स करायच्या यावर कोणतंही बंधन नाही. काही लोक ३०० पेक्षा जास्त पुश अप्सही करतात. पण दिवसाला ५० ते १०० पुश अप्स केल्याने तुम्हाला सगळे लाभ मिळू शकतात.

२० पुश अप्सने सुरूवात करा. पण या आकड्यावर थांबू नका. पुश अप्सची संख्या वाढवत रहा.

# युवकांमध्ये जॉगर्स जीन्सची क्रेझ

फॅशन वेगाने बदलते. आजकाल जीन्स पुन्हा बदलत आहेत. आजची तरुणाई फॅशनमध्ये आरामही शोधते. यामुळेच आजकाल तरुणांमध्ये जॉगर्स जीन्स आणि ट्राउझर्सची मागणी वाढू लागली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जॉगर्स जीन्स तरुणांमध्ये मोठी लोकप्रियता मिळवत आहेत. तज्ज्ञांच्या मते जॉगर्स जीन्स तरुणांना एक नवा आणि अनोखा लूक देत असून आरामाच्या बाबतीतही खास आहेत. त्यामुळे तरुणांना हा लूक खूप आवडू लागला आहे. विशेष म्हणजे जॉगर्स जीन्स आणि ट्राउझर्स पुरुष आणि महिला दोघांनाही आकर्षित करण्यात यशस्वी ठरत आहेत.



स्टाईल स्टेटमेंट

**जॉगर्स जीन्स म्हणजे काय?**

खरं तर जॉगर्स जीन्स हे जॉगग ट्राउझर्सचे रूपांतर आहे. ते जॉगग ट्राउझर्ससारखे दिसते. तसेच, ते अरुंद तळामुळे एक खास लूक देते. अक्षय कुमार, रणवीर सग, रणबीर कपूर, आयुष्मान खुराना, सैफ अली खान आणि जॉन अब्राहमसारखे अनेक स्टारदेखील या प्रकारच्या फॅशनमध्ये दिसले आहेत. तरुणाई ते टेक्स्चर्ड टी-शर्टसह घालणे पसंत करते, तर स्लोगन टी-शर्टसह ते खूप ट्रेंडमध्ये आहे. तज्ज्ञांच्या मते या जीन्सच्या वाढत्या क्रेझचे मुख्य कारण म्हणजे त्याचा फंकी लूक. तरुणांमध्ये वाढत्या जिमग क्रेझमुळे हा लूकही लोकप्रिय ठरत आहे. प्रत्येक लूक आणि पॅटर्नमध्ये उपलब्ध जॉगर जीन्स विशेषतः ऑथेंटिक डेनिम रंगात पसंत केली जात आहे. यासोबतच लोक त्याच्या झिरो बॉटमबद्दलही वेडे आहेत.


डेनिम फॅब्रिक्सव्यतिरिक्त कॉटन, कॉटन पॉलिस्टर, लिनेन फॅब्रिक्सच्या जॉगर पॅंटस ट्रेंडमध्ये आहेत. ऑथेंटिक डेनिम पॅंटनंतर, कॅमोफ्लॉज (मिलिटरी) जॉगर पॅंटदेखील लोकांना खूप आकर्षित करत आहेत.

# झारखंडमधील लोध धबधबा पाहायलाच हवा


दाट जंगल, उंच पर्वतरांगा आणि खडकांमधून वेगाने खाली कोसळणारा पाण्याचा प्रचंड प्रवाह... निसर्गाचे हे रौद्र आणि मनमोहक रूप पाहायचे असेल, तर झारखंडमधील लोध धबधबा एकदा नक्की पाहायला हवा.

बुढा नदीवर वसलेला लोध धबधबा हा झारखंडमधील सर्वात उंच धबधबा मानला जातो. उंच कड्यावरून पाणी खाली कोसळताना त्याची शुभ्र धार अक्षरशः दुधाच्या प्रवाहासारखी दिसते. आजूबाजूला असलेले घनदाट जंगल आणि डोंगररांगांमुळे या ठिकाणचे सौंदर्य आणखी खुलते. लोध धबधब्याचे आकर्षण केवळ झारखंडपुरते मर्यादित नाही. बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि छत्तीसगडमधूनही मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात. धबधब्याच्या परिसरात पोहोचल्यानंतर पाण्याचा वेगवान आवाज, हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा आणि खडकांवरून कोसळणारा शुभ्र पाण्याचा प्रवाह पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो.

भटकंती



लोध धबधब्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या खाली तयार झालेला खोल डोह. उंच कड्यावरून कोसळणारे पाणी ज्या ठिकाणी येऊन पडते, तेथे हा मोठा डोह तयार झाला आहे. या डोहाची खोली किती आहे, याचे अचूक मोजमाप आजवर करता आलेले नाही. दोरीच्या साहाय्याने खोली मोजण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र डोहाची खोली अधिक असल्याने त्याचा तळ गाठता आला नाही. त्यामुळे या डोहाचे गूढ पर्यटकांची उत्सुकता आणखी वाढवते. दाट जंगलाच्या सान्निध्यात असल्यामुळे लोध धबधबा केवळ धबधबा पाहण्यासाठीचे ठिकाण राहिलेले नाही. मित्र-मैत्रिणी आणि कुटुंबीयांसोबत पिकनिकचा आनंद घेण्यासाठीही पर्यटक येथे येतात. निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणे, कॅम्पिंग करणे, संगीताचा आनंद घेणे आणि डोंगर-जंगलाच्या वातावरणात निवांत क्षण अनुभवणे, असा वेगळा अनुभव येथे घेता येतो. लोध धबधब्याच्या परिसरातील शांत आणि हिरवाईने भरलेले वातावरण ध्यानधारणेसाठीही अनुकूल मानले जाते. शहरातील गोंगाटापासून दूर काही वेळ निसर्गाच्या सान्निध्यात घालवायचा असेल, तर हे ठिकाण मनाला वेगळीच शांतता देऊ शकते.



निसर्ग, साहस आणि शांतता यांचा एकत्र अनुभव घ्यायचा असेल, तर झारखंडचा लोध धबधबा तुमच्या प्रवासाच्या यादीत नक्की असायला हवा. उंच कड्यावरून कोसळणारा शुभ्र पाण्याचा प्रवाह, दाट जंगल आणि अथांग डोहाचे गूढ यामुळे लोध धबधबा झारखंडमधील एक अविस्मरणीय पर्यटनस्थळ ठरतो.

# बांधकाम कामगारांना मोफत कौशल्य प्रशिक्षण

नगर – बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना कामाचा व्यावहारिक सराव, आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळावी तसेच त्यांच्या कौशल्याला रोजगाराची जोड मिळावी, या उद्देशाने साईश्रद्धा फाउंडेशनच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'बांधकाम कामगार कौशल्य विकास वृद्धीकरण प्रशिक्षण कार्यक्रम' उत्साहात पार पडला. या प्रशिक्षणाला बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत कामगारांचा प्रतिसाद मिळाला.

प्रशिक्षणादरम्यान बांधकाम क्षेत्रात प्रत्यक्ष काम करताना आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाचा व्यावहारिक अनुभव, कौशल्यात सातत्याने वाढ, कामाची गुणवत्ता आणि त्यातून रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, अमित खामकर, नगरसेवक निखिल वारे, पै. महेश लोंढे, सुजय मोहिते, बाळासाहेब पवार, प्रा. हर्षल आगळे, प्रा. भगवान काटे, वाणी मॅडम, हराळ गुरुजी, सोमनाथ जाधव, अभी बोरुडे, विराज टाक, साईश्रद्धा फाउंडेशनच्या सचिव कु. श्रद्धा परकाळे, अर्चनाताई परकाळे उपस्थित होते. यावेळी बांधकाम कामगार उपस्थित होते.

प्रास्ताविकात फाउंडेशनच्या सचिव श्रद्धा परकाळे म्हणाल्या की, बांधकाम क्षेत्रातील कामगारांना केवळ रोजगार मिळणे पुरेसे नसून, बदलत्या काळानुसार त्यांच्या कौशल्यात वाढ होणेही आवश्यक आहे. कामगारांच्या या गरजा लक्षात घेऊन साईश्रद्धा फाउंडेशनने कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी अर्चनाताई परकाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षणामुळे कामगारांना त्यांच्या कामातील आत्मविश्वास वाढविण्यासोबतच भविष्यात रोजगाराच्या अधिक चांगल्या संधी मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, कामगारांच्या हाताला कौशल्य आणि त्या कौशल्याला योग्य संधी मिळाली, तर त्यांच्या कुटुंबाच्या जीवनात निश्चितच सकारात्मक परिवर्तन घडू शकते. बांधकाम कामगार हा शहराच्या विकासातील एक घटक आहे. त्यांच्या कष्टातून शहरातील घरे, इमारती आणि विविध विकासकामे उभी राहत असतात. त्यामुळे त्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची गरज आहे. फाउंडेशनने बांधकाम कामगारांच्या कौशल्य विकासासाठी घेतलेला हा उपक्रम समाजोपयोगी आणि प्रेरणादायी आहे. कामगारांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न कौतुकास्पद असून, अशा समाजहिताच्या उपक्रमांना सदैव पाठिंबा देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी असल्याचेही आमदार जगताप यांनी सांगितले.



साईश्रद्धा फाउंडेशनच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



## गुरुवाणी – ५१




### क्षमापना करणाराच सम्यक्त्वी!

आपण सगळे जिन शासनात आहोत. जिन शासन म्हणजे जयवंत. आपण सगळे म्हणतो जैन धर्मासारखा दुसरा धर्म नाही. जैन धर्मात विश्व धर्म होण्याचे सामर्थ्य आहे. तीर्थंकरांचे अनंत पुण्य असते. हे सगळं सत्य आहे, तरीही आपले वर्तमान वेगळे का आहे? आपली युवा पिढी भगवान महावीरांना सोडून इतरत्र का भरकटत आहे? सगळे विखुरलेले का आहेत? आपण खरच २४ तास जैन म्हणून राहतो का? आपल्यात जैनिझम संस्कृती, व्यवस्था आहे? तीर्थंकर परमात्म्याची साधना सर्वांना माहीत आहे का? ज्यांना महावीर पूर्ण माहिती नाही त्यांना महावीरांचा धर्म कसा कळणार? हे असे का? या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न मी आजही करत आहे. संवत्सरी काय आहे? जगातील सगळे सण उत्सव देवता किंवा काही घटनांवर आधारित आहेत. पण संवत्सरीची कोणतीही देवता नाही. सगळ्या धार्मिक उत्सवात कोणाची तरी पूजा होतेच. तरीही संवत्सरीला अधिक महत्त्व आहे कारण तीर्थंकर सुद्धा संवत्सरीची आराधना करायचे. साधूसाध्वींना तर संवत्सरी आराधना अनिवार्य आहे. जगाला बरबाद होण्यापासून वाचवणारा उत्सव म्हणजे पर्युषण पर्व, संवत्सरी आहे. पर्युषण पर्व सारखा उत्सव साजरा करणारा जगात दुसरा धर्म नाही. क्षमा, संयम, तपस्या, आलोचना, प्रतिक्रमण हे जगासाठी साधना आहे, पण जैन धर्मात हा मोठा सण उत्सव आहे. मला वाटते, एखादे लोकमान्य टिळक जैनांमध्ये असते तर आज संपूर्ण जगाने पर्युषण पर्व साजरे केले असते. हा क्षमेचा उत्सव आहे. आज कोणी संवत्सरीला आराधना केली नाही तर तो नकळत जिन शासनचा अपमान करत आहे. धर्म मूल्ये, जिन शासनाची मूल्ये जपणे गरजेचे आहे. सर्वांनी लक्षात ठेवावे घरात कोणाशीही भांडणे झाली तरी सर्वांनी सोबतच जेवण केले पाहिजे. संवत्सरीची साधना, सिद्धी अद्भुत आहे. हे पर्व अपराधीला आराधक बनवण्याचे पर्व आहे. शत्रुला मित्र बनवायचे पर्व आहे. हा प्रायश्चित्त करण्याचा उत्सव आहे. साधू साध्वींसह सगळ्यांनीच क्षमापना करूनच संवत्सरीचा पारणा केला पाहिजे. 'जो क्षमापना करता है उसकी आराधना है, जो क्षमापना नहीं करता उसकी आराधना नही' संवत्सरीला जो क्षमापना करतो तो सम्यक्त्वी आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# 'नेक्स्ट लेवल फिटनेस'च्या मयांक कनोजिया आणि याझ्ना लांडगे यांचे नॅशनल पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत यश

नगर – गाझिपूर, उत्तर प्रदेश येथे २ सप्टेंबर रोजी नुकत्याच पार पडलेल्या सिनियर नॅशनल पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत नेक्स्ट लेवल फिटनेस येथील खेळाडू मयांक सुरजप्रकाश कनोजिया व याझ्ना अनिल लांडगे यांनी आपआपल्या वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करून सिल्वर मेडल पटकाविले. त्यांना नेक्स्ट लेवल फिटनेसचे संचालक व प्रशिक्षक ओंकार गुर्रम, प्रशिक्षक विजय कनोजिया यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अहिल्यानगर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष डेव्हिड मकासरे ह्यांनी अभिनंदन केले. तसेच खेळाडूंचा नेक्स्ट लेवल फिटनेसचे रूपेश गायकवाड, आंतराष्ट्रीय खेळाडू अर्चना काळे, श्रेयस भिंगारदिवे, शुभम गाडे, नॅशनल खेळाडू अस्मिर जहागीरदार, यश मोरे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.


'नेक्स्ट लेवल फिटनेस'च्या मयांक कनोजिया व याझ्ना लांडगे नॅशनल पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत यशस्वी झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना 'नेक्स्ट लेवल फिटनेस'चे संचालक ओंकार गुर्रम आदी.



आर्या शिंदे हिने राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेत भारतात द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल सूर्या फाउंडेशनच्या वतीने तिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

# राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेत अहिल्यानगरच्या आर्या शिंदेला भारतात द्वितीय क्रमांक

नगर – अहिल्यानगर शहरातील सिव्हिल हडको परिसरात राहणाऱ्या आर्या अमित शिंदे हिने पंजाबमधील लुधियाना येथे झालेल्या राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेत भारतात द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल सूर्या फाउंडेशनच्या वतीने तिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष काका शेळके यांच्या पुढाकाराने आयोजित कौतुक सोहळ्यात सिव्हिल हडकोच्या माजी नगरसेविका कलावती शेळके व चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते आर्या शिंदे हिचा सत्कार करण्यात आला.

यावेळी दत्तात्रय खैरे, पै. युवराज करंजुले, लक्ष्मण शेळके, काका शेळके, अमित शिंदे, संजय मुळे, राजू रोकडे, रवींद्र बोडके, अथर्व गंगावणे, अथर्व बगाडे, संग्राम शेळके, रोहन मोठे, कृष्णा टपळे, नितीन फल्ले, शेखर ढुमणे, शारदा शेळके, सारिका शेळके, लोढा भाभी, वंदना रोकडे, मुळे ताई, दिपाली बगाडे, सीमा गंगावणे, ज्योती शिंदे, नीता करंजुले, तृप्ती परभने, जया चंगेडिया, सविता क्षीरसागर, आशा परभने, अलका खराडे, कमल सोनवणे, वैजा परभने, सुरेखा धाडगे आदीसह परिसरातील नागरिकांनी तिच्या यशाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आर्या शिंदे हिला ज्युदोचे प्रशिक्षक संजय धोपावकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# संघटन कौशल्यातून समाजकार्य : शैलेश मुनोत



स्वतःचा उत्कर्ष साधण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करतो. पण आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाप्रती कर्तव्य भावनेने योगदान देणारे सर्वांसाठी अनुकरणीय असतात. आईवडीलांचे उच्च कोटीचे संस्कार आणि गुरुजनांच्या शिकवणीनुसार नगरमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले व्यक्तीमत्त्व म्हणजे जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त (दि. १५ सप्टेंबर २०२६) शुभेच्छापर लेख...

एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळख असलेल्या शैलेश मुनोत यांच्यावर वडील स्व.सुरेश मुनोत यांनी नीतिमूल्ये जपण्याचे, सामाजिक बांधिलकी जपण्याचे संस्कार केले. त्यामुळेच एक यशस्वी व्यावसायिक म्हणून तसेच तळमळीने सामाजिक कार्य करणारे नेतृत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. नवीपेठ परिसरातील जय आनंद महावीर युवक मंडळ म्हणजे सामाजिक कार्याचा मानबिंदू मानले जाते. नगर शहराच्या सामाजिकतेच्या परंपरेला साजेसे व अनुरुप असे काम हे मंडळ मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली अव्याहतपणे करीत आहे. यंदा हे मंडळ रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. यानिमित्त मंडळातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

मुनोत यांच्या धडाडीच्या संघटन कौशल्यातून मंडळात समाजकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार झाली आहे. या कार्यात त्यांनी केवळ तरूणांनाच नाही तर महिलांनाही सहभागी करून घेत महिला शक्तीला प्रोत्साहन देण्याचे काम चालवले आहे. मंडळाच्या वतीने मुनोत यांच्या नेतृत्वाखाली परंपरा जपणारा गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात येतो. याशिवाय वर्षभर विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात येतात. यात वंचित मुलांच्या संस्थांना मदत, क्रीडा साहित्याची भेट दिली जाते. स्व. सुरेश मुनोत यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबीर, नेत्र तपासणी शिबिर घेण्यात येते. शिक्षक सन्मान, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात येतात. दरवर्षी राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त २८ मार्चला महाभोजन कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. हजारो भाविक याचा लाभ घेतात. विविध राष्ट्रीय सण, उत्सव, शिवजयंती, भगवान महावीर जयंती मंडळातर्फे उत्साहात साजरी येते.

जैन ओसवाल पंचायत सभेचे प्रधानमंत्री म्हणूनही ते योगदान देत आहेत. याशिवाय सध्या ते सहकारी ग्राहक भांडारचे व्हाईस चेअरमन आहेत. जैन ओसवाल पंचायत पतसंस्थेचे चेअरमनपद, नगर क्लबचे संचालकपदही त्यांनी भूषविले आहे. युवा पिढीला सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी ते कायम प्रेरित करीत असतात. अभ्यासू व संवेदनशीलता असा दोन्हीचा संगम त्यांच्या ठायी असल्याने ते विविध क्षेत्रात सहजतेने वावरतात. सहकार्यांना प्रेरित करण्याची त्यांची हातोटी विलक्षण अशीच आहे. त्यामुळे त्यांच्या भोवती समविचारी कार्यकर्त्यांची नेहमीच गर्दी असते. त्यांना वाढदिवसानिमित्त निरोगी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा!

– **बाबालाल गांधी**, नगर

# गोपालकृष्ण कॉलनीतील जयहिंद मित्र मंडळाच्या 'श्रीं'ची प्रतिष्ठापना



भिंगार – सर्वधर्मियांच्या सहभागातून गोपालकृष्ण कॉलनीतील जयहिंद मित्र मंडळाच्या श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. मुस्लिम, ख्रिश्चन नवबौद्ध आणि हिंदू बांधवांमुळे सामाजिक समरसता दिसून आली. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणाऱ्या मंडळाचे यंदा ३५ वे वर्ष आहे. ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूकीने गणरायाचे आगमन झाले. धर्मेंद्र जाधव यांनी सपत्नीक गणरायाची प्रतिष्ठापना केली. याप्रसंगी पुरुषोत्तम व्यवहारे यांनी पौरोहित्य केले. महेंद्र जाधव यांनी भाविकांचे स्वागत केले. रोज सकाळ संध्याकाळ महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. गणेश विसर्जनाच्या आदल्या दिवशी महाप्रसादाचे होणार आहे. तसेच सर्वांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे.

गणेशोत्सवाच्या तयारीसाठी सागर सुर्यवंशी, खिजर खान, गणेश शिंदे, हितेन कांबळे, ऋषिकेश व्यवहारे, सुजल परदेशी, श्रेयस शिंदे, मयुर साळवे, साईश व समर्थ जाधव, श्रवण जाधव, पियुश चाबुकस्वार, चैतन्य गोरडे यांनी अथक परिश्रम घेतले. रिद्धी व्यवहारे, निर्मोही कुलट, पूर्वा साळवे, आरोही बोळे यांनी गणरायाचे मंडळासमोर चित्तवेधक रांगोळी काढली.

यावेळी नवनाथ आमले, बलभीम कांबळे, कराळे काका, कुंदन परदेशी, दिलीप बोंदरडे, मयूर बोळे, देवेंद्र जाधव तसेच महिला भाविक उपस्थित होते.

# पंकज ललवाणी यांच्या ५१ दिवसाच्या उपवासाची १७ सप्टेंबरला जैन स्थानकात 'पुर्णाहुती सोहळा'



श्रीरामपूर – येथील जैन स्थानकमध्ये चातुर्मास निमित्त आलेल्या श्रमण संघाच्या उपप्रर्वतिनी साध्वीजी चंदनबालाजी व जिनशासन प्रभाविका पद्मावतीजी म.सा. व त्यांच्या शिष्या यांच्या प्रेरणेने व आशिर्वादाने शहरातील पंकज धनराज ललवाणी यांनी लगातार ५१ दिवसाचे निरंकार उपवासाची तपश्चर्या आनंदमय व मंगलमय वातावरणात सुरु आहे. पंकज ललवाणी यांचे ५१ दिवसाच्या उपवासाची पुर्णाहुती सोहळा १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज रोड वरील जैन स्थानकमध्ये उपस्थित असलेल्या साध्वीजींच्या मुखरविद्या व मंत्रोपचाराने होणार आहे.

पंकज ललवाणी हे तपस्वी श्रीरामपूर मधील प्रमुख व्यापारी स्वर्गीय कचरदास ललवाणी व श्रीमती मदनबाई कचरदास ललवाणी यांचे नातु तर स्वर्गीय धनराज ललवाणी यांचे पुत्र आहे. प्रत्येक चातुर्मासमध्ये ते तपसाधना करतात. गतवर्षी २०२५ मध्ये त्यांनी ३१ उपवासाची तपश्चर्या केली होती. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता जैन स्थानकमध्ये होणाऱ्या तपपुर्ती सोहळ्यास सकल जैन समाजाने उपस्थित रहावे, असे आवाहन ललवाणी परिवार व त्यांचे आप्तेष्ट तसेच जैन श्रावक संघ, श्रीरामपूर चार्तुमास व दिक्षा कमिटी व सकल जैन समाजाने केले आहे.



# लौकीक गदिया यांच्या तपपुर्ती सोहळ्यानिमित्त १६ सप्टेंबर रोजी 'संवत्सरी पारणा'चे आयोजन







श्रीरामपूर – येथील जैन स्थानकमध्ये चातुर्मास निमित्त आलेल्या श्रमण संघाच्या उपप्रर्वतिनी साध्वीजी चंदनबालाजी व जिनशासन प्रभाविका पद्मावतीजी म.सा. व त्यांच्या शिष्या यांच्या प्रेरणेने व आशिर्वादाने उद्योजक नितीन गदिया यांचे पुत्र तसेच किशोर गदिया व नविन गदिया यांचे पुतणे लौकीक नितीन गदिया यांनी ८ दिवसाचे निरंकार उपवास केले असुन या तपश्चर्येचा पूर्णाहुती सोहळी १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता जैन स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज रोड, श्रीरामपूर येथे होणार आहे.

चि. लौकीक यांच्या तपपुर्ती सोहळ्यानिमित्त संवत्सरी पारणा याचे आयोजन १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जैन स्थानक मध्ये करण्यांत आले आहे. तपपुर्ती सोहळ्यास व संवत्सरी पारणा सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीमती पुष्पलता सुरेश गदिया, किशोर सुरेश गदिया, नितीन सुरेश गदिया, नविन सुरेश गदिया व जैन श्रावक संघाने केले आहे.

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दि.११ ते १७ सप्टेंबर २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
हैवान (हिंदी) SCREEN - 1

09.00 AM 100/-
12.00 AM 150/-
03.00 AM 150/-
09.00 AM 150/-

हनुमान अंश
09.00 PM 100/-
SCREEN - 2
09.30 PM 100/-
01.30 PM 150/-
05.00 PM 150/-
09.05 PM 150/-
मिर्झापूर

आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 04 ते 10 सप्टेंबर 2026

08:00 AM 07:15 PM
11:00 AM 07:30 PM
12:30 PM 10:15 PM
02:00 PM
हनुमान अंश (हिंदी)

टॉक्सिक
08:30 AM
03:30 AM
10:15 PM

मिर्झापूर
03:15 PM
08:00 AM 06:00 PM
10:00 AM 06:50 PM
11:35 PM 09:45 PM
02:15 PM 10:30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001


डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

